POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३०३ ● मुंबई, शुक्रवार, ०५ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

फुगेवाडी विषारी दारू प्रकरणानंतर मोठी कारवाई

मुख्य आरोपीच्या अनधिकृत घरावर महापालिकेचा हातोडा

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक





पुणे पिंपरी चिंचवडमध्ये विषारी दारूमुळे 20 हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनं संपूर्ण राज्य हादरून गेलंय. या दारू कांडातील दारू विक्रेता आरोपी कर्नलसिंग विरखा याच्या घरावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेनं हातोडा चालवलाय. पिंपरी चिंचवडच्या फुगेवाडी मधल्या संजय नगर परिसरात अत्यंत छोट्या गल्लीत विरखा त्याच्या घरातून दारूचा गुत्था चालवायचा. याच घरावर महापालिकेनं हातोडा चालवलाय. या कारवाईदरम्यान महापालिकेला मोठ्या आव्हांना सामोरं जावं लागलंय. अत्यंत अरुंद गल्ल्यांमुळे ही कारवाई करताना महापालिकेला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागलाय. पिंपरी चिंचवड महानगर पालिकेने ब्रेकर आणि मजुरांच्या सहाय्याने अखेर विरखाचं घर पाडलंय.

फुगेवाडी येथील संजय नगरमध्ये विरखा गेली ४० वर्ष बेकायदेशीर हातभट्टी दारूचा अड्डा चालवत होता. या कारवाईसाठी पोलिसांचा मोठा पोलीस बंदोबस्त बोलावण्यात आला होता. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासनाकडून योग्य खबरदारी घेण्यात आली होती.

विरखाने विकलेल्या विषारी दारूमुळे अनेक कुटुंब उद्ध्वस्त झाले. विरखाच्या या अवैध गुत्थ्याविरोधात अनेकदा नागरिकांनी तक्रार करूनही पोलीस प्रशासनानं त्याकडे दुर्लक्ष केलं, म्हणून आज इतक्या जणांना आपला जीव गमवावा लागलाय. यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपायुक्त अण्णा बोदडे यांनी सांगितलं की, "महापालिकेने या प्रकरणाची सखोल माहिती घेऊन ही कारवाई केली आहे. संबंधित जागेची कागदपत्रे, बांधकामाची स्थिती आणि कायदेशीर बाबींची तपासणी केली होती. या सर्व तपासणीनंतर हे बांधकाम पूर्णतः अनधिकृत असल्याचे समोर आले. त्यानंतर नियमांनुसार नोटीस प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष पाडकामाची कारवाई करण्यात आली आहे. तसंच ही कारवाई करताना कोणताही अनुचित प्रकार घडू नये पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आले होते. तसंच पोलीस प्रशासन आणि महापालिका प्रशासन यांच्या संयुक्त बंदोबस्तात ही पाडकाम कारवाई करण्यात आली.

गुळात साखरेची भेसळ आढळली

राज्यभरात तब्बल 97 लाखांचे वेगवेगळे पदार्थ जप्त

■मुंबई । प्रतिनिधी,

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून भेसळखोर, दिशाभूल जाहिराती करून आयुर्वेदिक औषधे विकणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई सुरू केली आहे. गेल्या दोन दिवसांत झालेल्या कारवाईत राज्यभरात 97 लाख रुपयांचा अन्न पदाथार्चा साठा जप्त करण्यात आला आहे. वेगवेगळे भेसळयुक्त पदार्थ जप्त करण्यात आलेत. त्यात आंबे, बंधी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कॅडी, गूळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईसक्रीम, गुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाल्यांचे पदार्थ, शेंगदाणे चिक्की व तसेच भेसळीसाठी वापरण्यात येत असलेल्या पदार्थ असा 84 हजार किलो इतका साठा जप्त करण्यात आला आहे.

गुळामध्ये साखरेची भेसळ

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील तीन गुळ निर्मिती कारखान्यावर छापे टाकले. त्यात गुळामध्ये साखरेची भेसळ होत असल्याचे आढळून आले आहे. तिन्ही ठिकाणी तब्बल दहा लाख 66 हजार रुपयांची किंमतीच्या गुळाचा 15 हजार किलो साठा जप्त करण्यात आला आहे. तर नवी मुंबईतील एमपीएससी मार्केटमध्ये कृत्रिमरित्या आंबे पिकविण्यासाठी इथिलीन स्प्रे व संशयीत द्रवाचा वापर करताना आढळून आले आहे. येथून तब्बल 11 लाख 12 हजार रुपयांची आंबे जप्त करण्यात आले आहे.

आरोग्याशी खेळ करणाऱ्याविरुद्ध कठोर फौजदारी कारवाई करणार

अन्न व सुरक्षा मानके कायद्याखाली गुन्हे करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संगिता 2023 च्या कलम 129 अंतर्गत चाप्टर केसेस दाखल करून त्यांच्याकडून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र घेण्यात येणार आहे. तसेच पुन्हा गुटखा, विक्री करून व अन्नात भेसळ करून गुन्हा केल्यास त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा अन्न व औषध प्रशासनातर्फे देण्यात आलेला आहे.

पानमसाला विक्रेत्यांना दणका

मागील दोन दिवसात राज्यातील प्रतिबंधित गुटखा, पानमसाला विक्रेत्यांवर कारवाई झाली आहे. त्यात 32 आरोपींना अटक करण्यात आली असून, 26 दुकाने सील करण्यात आले आहेत. त्यात कोकण विभागात तब्बल 16 दुकानांवर कारवाई करत 16 जणांना अटक करण्यात आली आहे.









तुकाराम मुंढेंची 'सर्जिकल स्ट्राईक'! प्रशासनाची धडक कारवाई

तब्बल 13 लाखांचा भेसळयुक्त तुपाचा साठा जप्त... नागरिकांच्या जीवाशी खेळ

तुकाराम मुंढेंनी जेव्हापासून अन्न-औषध प्रशासनाचा आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे, तेव्हापासून राज्यात अन्न किंवा औषधांमध्ये भेसळ करणाऱ्यांचे धाबे चांगलेलच दणाणले आहेत.

■जालना । प्रतिनिधी,

जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील तीर्थपुरी येथे अन्न व औषध प्रशासनानं भेसळयुक्त तूप निर्मिती करणाऱ्या आस्थापनावर मोठी धडक कारवाई करत तब्बल 13 लाख 4 हजार 539 रुपयांचा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील अन्न भेसळीच्या प्रकारांवर मोठा प्रकाश पडला असून ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या भेसळखोरांचे धाबे चांगलेच दणाणले आहेत.

तुकाराम मुंढेंचे आदेश अन...

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निदेर्शानुसार 3 जून रोजी जालन्याच्या तीर्थपुरी येथील मे. मुंदडा इंडस्ट्रीज या आस्थापनाची तपासणी करण्यात आली. यावेळी अधिकाऱ्यांना धक्कादायक बाबी आढळून आल्या. खाद्यतेल आणि विविध प्रकारचे एसेन्स वापरून तुपासारखा दिसणारा पदार्थ तयार करून त्याची विक्री केली जात असल्याचे प्राथमिक तपासात उघड झालं. कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी आस्थापनातील एकूण 1903 लिटर साठा जप्त केला. या साठ्याची किंमत 13 लाख रुपयांहून अधिक असल्याचं सांगण्यात आलं. जप्त करण्यात आलेल्या मालामध्ये 1121 लिटर पॅकबंद तूप, ८663 लिटर खुले तूप तसेच 118 लिटर रिफाइंड सोयाबीन तेलाचा समावेश आहे. या व्यतिरिक्त तूप निर्मितीसाठी वापरण्यात येणारे एसेन्स देखील अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतलं.

संबंधित आस्थापनं पूर्णपणे सील

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरून विविध ब्रँडच्या तुपाचे नमुने, खुल्या स्वरूपातील तूप, रिफाइंड सोयाबीन तेल आणि एसेन्स असे एकूण आठ नमुने संकलित केले आहेत. हे सर्व नमुने पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे. दरम्यान, कारवाईनंतर संबंधित आस्थापनं पूर्णपणे सील करण्यात आले असून पुढील आदेश मिळेपर्यंत कोणत्याही प्रकारचं उत्पादन अथवा व्यवहार करण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणात आणखी काही धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पुढील काळातही अशाच धडक तपासणी मोहिमा

ही कारवाई छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाआयुक्त (अन्न) एस. आर. करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. जालना येथील सहाय्यक आयुक्त नि. सु. कुलकर्णी, अन्न सुरक्षा अधिकारी अश्विनी तांबे, अनुजा नगरारे तसेच नमुना सहाय्यक धम्मदीप नरवडे यांच्या पथकाने ही यशस्वी मोहीम राबविली. अन्न व औषध प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं असून तूप किंवा इतर अन्नपदार्थ खरेदी करताना त्यांची गुणवत्ता, पॅकिंग व अधिकृत माहिती तपासूनच खरेदी करावी, असं सांगितलं आहे. जिल्ह्यात अन्न भेसळ रोखण्यासाठी पुढील काळातही अशाच धडक तपासणी मोहिमा राबविण्यात येणार असून भेसळखोरांविरोधात कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशाराही प्रशासनानं दिला आहे.

राहुरी व नेवासा तालुक्यात 2 लाख 84 हजार 180 रुपये किमतीचे संशयित आईस्क्रीम व खाद्यतेल जप्त



■पुणे। प्रतिनिधी,

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या अन्न भेसळविरोधी विशेष मोहिमेत राहुरी व नेवासा तालुक्यात कारवाई करून 2 लाख 84 हजार 180 रुपये किमतीचे संशयित आईस्क्रीम व खाद्यतेल जप्त करण्यात आले असून नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी केले आहे. राहुरी येथील शिवशक्ती आईस्क्रीम या आस्थापनाची तपासणी करून शिवशक्ती ब्रँडच्या आईस्क्रीम गुलकंद व अमेरिकन नट्स या उत्पादनांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. दजार्हीन असल्याच्या संशयावरून या ठिकाणी 41 हजार 440 रुपये किमतीचे एकूण 148 पॅकेट्स आईस्क्रीम जप्त करण्यात आले. तसेच नेवासा तालुक्यातील कडू गल्ली येथील संतोष किराणा स्टोअर्सची तपासणी करून एसबीजी ब्रँडच्या रिफाइंड पामोलीन ऑईल या खाद्यतेलाचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला. हा साठा संशयास्पद आढळल्याने 2 लाख 42 हजार 740 रुपये किमतीचे 1 हजार 498.4 किलो खाद्यतेल जप्त करण्यात आले. अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार व सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा मानके कायदा 2006 व नियम 2011 अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार, अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. पाटील व सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी या कारवाया केल्या आहेत. नागरिकांना स्वच्छ व भेसळमुक्त अन्न उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हाभर ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात सुरू आहे. अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

आंदोलन पेटताच सरकारचे तातडीने दोन जीआर... तरीही शेतकऱ्यांची नाराजी का संपेना... कांद्याला किती हवा भाव?

■पुणे। प्रतिनिधी,



कांदा प्रश्नावर गेल्या 15 दिवसांत उत्तर महाराष्ट्रासह पश्चिम महाराष्ट्रात उग्र आंदोलन झाले. रास्ता रोको झाला. महाविकास आघाडीने सुद्धा बंदची हाक दिली. दोन ते तीन आंदोलनं झालीत. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्लीत जात शेतकर्यांच्या व्यथा मांडल्या. काही मागण्यांबाबत केंद्र सरकारने अनुकूल धोरण घेतले. त्यानंतर सरकारने तातडीने दोन शासन निर्णय निर्गमित केले. तरीही शेतकऱ्यांचं काही समाधान झालेले नाही. आंदोलनाचा पवित्रा कायम आहे. कांदा उत्पादक शेतकरी सरकारवर नाराज आहे. शेतकरी आणि सरकार यांच्यात हमीभावावरून पेच असल्याचे समोर येत आहे.

कांदा खरेदीसाठी सरकारचे दोन परिपत्रक


शासकीय कांदा खरेदीसाठी आठवडाभरात शासनाने दोन परिपत्रक काढले आहे. कांदा खरेदी दरात सरकारने ३ रुपये ४५ पैशांची वाढ केली आहे. त्यामुळे आता कांदा खरेदीदर १५.८० रुपये प्रति किलो इतका झाला आहे. कांदा खरेदीतील जाचक अटी शिथिल केली आहे. शेतकऱ्यांना सरकारने अजून एक दिलासा दिला आहे. पण शासनाच्या निर्णयानंतरही शेतकर्यांची २५ रुपये प्रति किलो दर मिळावा ही मागणी कायम आहे. बाजार समित्यांमधून थेट २५ रुपये दराने कांदा खरेदी करण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे.

वाढीव दर आणि अटी शिथिल करूनही शेतकरी समाधानी नाहीत. कांदा खरेदी धोरणावर शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारकडे पुन्हा वाढीव हमीभावाची आग्रहही मागणी केली आहे. कांदा प्रश्नावर शासनाच्या पुढील निर्णयाकडे शेतकर्यांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे याप्रकरणी कांदा उत्पादक शेतकरी पुन्हा आंदोलन करण्याची शक्यता आहे. तर विरोधकांनी सरकारच्या धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

बाजार समिती शुल्क ही माफ

शासकीय कांदा खरेदीवर बाजार समिती शुल्क माफ करण्याचे आदेश देण्यात आले आहे. राज्य सरकारच्या पणन संचालनालयाने याविषयीचे परिपत्रक काढत आदेश दिले आहेत. नाफेड-एनसीसीएफच्या कांदा खरेदीवर बाजार समित्या शुल्क आकारू शकणार नाहीत. 2 लाख मेट्रिक टन कांदा खरेदीचे सरकारचे उद्दिष्ट आहे. तर यामुळे 316 कोटींची उलाढाल अपेक्षित आहे. शुल्क माफीमुळे बाजार समित्यांचे 3 कोटी 16 लाख रुपयांचे संभाव्य नुकसान होणार आहे. तर आता व्यापाऱ्यांनीही शुल्क माफीची मागणी लावून धरली आहे. बाजार समित्यांच्या उत्पन्नावर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. कांदा खरेदीच्या ताज्या निर्णयामुळे बाजार समित्या आणि व्यापार्यांमध्ये नाराजी आहे.

नवी मुंबईतील बाप-लेक अटकेत... घातक रसायने पुरविल्याचे उघड, आतापर्यंत ३३३ जणांवर कारवाई



■पुणे। प्रतिनिधी,

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात २२ जणांचा बळी घेणाऱ्या विषारी दारू प्रकरणात गुन्हे अन्वेषण विभागाने नवी मुंबईतील बाप-लेकाला अटक केली आहे. बनावट दारू तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या घातक रसायनांचा पुरवठा केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अरुण जगदंब चौबे (५९) आणि अभिषेक अरुण चौबे (२४) अशी असून दोघेही नवी मुंबईतील वाशी परिसरातील रहिवासी आहेत. विषारी दारू रॅकेटच्या तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनंतर सीआयडीच्या विशेष पथकाने ही कारवाई केली.

घातक रसायनांचा पुरवठा केल्याचा आरोप

तपासादरम्यान विषारी दारू तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या धोकादायक रसायनांचा पुरवठा चौबे पिता-पुत्रांनी केल्याचे समोर आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पुरवठा साखळीतील त्यांच्या भूमिकेचा मागोवा घेत सीआयडीने दोघांना नवी मुंबईतून ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना पिंपरी येथील न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांनाही चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. रसायनांचा स्रोत, वितरण व्यवस्था आणि या रॅकेटशी संबंधित इतर दुव्यांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

पुण्यात मोठ्या स्कॅंडलचा भांडाफोड

बारावी पास तरुण करायचा महिलांची गर्भलिंग चाचणी...

दौंड तालुक्यातील केडगाव परिसरात बेकायदेशीर गर्भलिंग तपासणी सुरू असल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर आरोग्य विभागाने तक्रार दाखल केली आणि पोलिसांनी सखोल चौकशी सुरू केली.

■पुणे। प्रतिनिधी,

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात उघडकीस आलेल्या गर्भलिंग तपासणी रॅकेटने आरोग्य यंत्रणा आणि कायदा अंमलबजावणी संस्थांना हादरवून सोडले आहे. बारावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या एका व्यक्तीने स्वतःला तज्ज्ञ असल्याचे भासवत पोर्टेबल सोनोग्राफी मशीनच्या सहाय्याने गर्भलिंग तपासणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात दोन जणांना अटक करण्यात आली असून आणखी काही संशयितांचा शोध सुरू आहे.

सोशल मीडियावरील व्हिडिओमुळे उघड झाले रॅकेट

दौंड तालुक्यातील केडगाव परिसरात बेकायदेशीर गर्भलिंग तपासणी सुरू असल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. त्यानंतर आरोग्य विभागाने तक्रार दाखल केली आणि पोलिसांनी सखोल चौकशी सुरू केली. तपासादरम्यान एका घरातून गुप्तपणे गर्भलिंग निदान केले जात असल्याचे समोर आले. या कारवाईत पोर्टेबल सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आले.

डॉक्टर नसतानाही करत होता सोनोग्राफी

मुख्य आरोपी अण्णासाहेब गिरी हा केवळ बारावी



उत्तीर्ण असून त्याच्याकडे कोणतीही वैद्यकीय पदवी किंवा अधिकृत परवाना नव्हता. तरीही तो चीनमध्ये तयार केलेले पोर्टेबल अल्ट्रासाऊंड उपकरण मोबाईल ॲपशी जोडून गर्भलिंग तपासणी करत असल्याचा आरोप आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तो 2024 पासून हा बेकायदेशीर व्यवसाय चालवत होता.

प्रत्येक तपासणीसाठी हजारो रुपयांची आकारणी

तपास यंत्रणांच्या प्राथमिक माहितीनुसार, आरोपी प्रत्येक गर्भलिंग तपासणीसाठी सुमारे 5 हजार ते 15 हजार रुपये घेत होता. गर्भात मुलगी असल्याचे आढळल्यास संबंधित महिलांना गर्भपातासाठी इतर डॉक्टरांकडे पाठवले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणात एका आयुर्वेदिक डॉक्टरलाही अटक करण्यात आली असून दोन डॉक्टर फरार असल्याची माहिती समोर आली आहे.

महिन्याला अनेक महिलांची तपासणी

पोलिस चौकशीत आरोपीने दरमहा 15 ते 20 महिलांची तपासणी केल्याचा दावा केला आहे. मात्र काही अधिकाऱ्यांच्या मते हा आकडा 30 ते 50 पर्यंत असू शकतो. त्यामुळे गेल्या दोन ते तीन वर्षात किती महिलांची बेकायदेशीर गर्भलिंग तपासणी झाली आणि त्यानंतर किती गर्भपात करण्यात आले, याचा तपास सुरू आहे. मोबाईल डेटा, डिजिटल संवाद आणि आर्थिक व्यवहारांची पडताळणी केली जात आहे.

PCPNDT कायद्याअंतर्गत कठोर कारवाई

भारतामध्ये गर्भलिंग तपासणी आणि लिंग निवडीसाठी गर्भपात करणे कायद्याने गुन्हा आहे. या प्रकरणात आरोपींविरोधात PCPNDT कायदा तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तपास यंत्रणांना या रॅकेटमागे मोठे रेफरल नेटवर्क कार्यरत असल्याचा संशय असून आणखी अटक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या कारवाईमुळे राज्यातील अशा बेकायदेशीर प्रकारांवर अंकुश आणण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

सरकारची ऑनलाईन फसवणूक!



आजच्या डिजिटल युगात लाखो लोकांची ऑनलाईन फसवणूक होत असल्याच्या बातम्या आपण प्रतिदिन ऐकतो किंवा वाचतो. सरकार त्याविषयी जनतेत सतत जागृती करत असते; पण जेव्हा सरकारचीच ऑनलाईन फसवणूक होते, तेव्हा त्याला काय म्हणणार? विशेष म्हणजे सरकारची ही फसवणूक त्याच अधिकारी आणि कर्मचारी यांनी केली आहे, जे लोकांना ऑनलाईन फसवणुकीपासून सावध करण्याचे काम करतात! महाराष्ट्र सरकारच्या बहुचर्चित 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेचा ५ लाख सरकारी कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांनी अपात्र असूनही लाभ घेतल्याचे उघड झाले. या घटनेमुळे राज्याच्या प्रशासकीय व्यवस्थेविषयी गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याकडे केवळ आर्थिक गैरव्यवहार म्हणून पाहून चालणार नाही, तर याकडे शासकीय यंत्रणेतील गंभीर त्रुटी आणि सरकारची फसवणूक या दृष्टीकोनांतूनही पाहिले पाहिजे. सरकारी कर्मचाऱ्यांसह अन्य ८१ लाख अपात्र लाभार्थ्यांनीही या योजनेचा जवळजवळ २ वर्षे अपलाभ घेतला. या भामट्यांनी प्रत्येक महिन्याला सरकारकडून १ सहस्र ५०० रुपये, असे सलग २ वर्षे पैसे घेतले. आजमितीस ही रक्कम थोडीथोडकी नाही, तर उणे-अधिक ३० सहस्र कोटी रुपयांच्या घरात जाते! त्यामुळेच हा करदात्या जनतेच्या पैशांवर घातलेला दरोडाच आहे, असे म्हटल्यास आश्चर्य वाटायला नको. राज्य विधानसभेच्या वर्ष २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या तोंडावर 'लाडकी बहीण' योजना चालू करण्याचे आश्वासन भाजपप्रणीत महायुती सरकारने दिले होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना आधार देणे, हा या योजनेचा हेतू होता. आधुनिकतेच्या नावाखाली ही संपूर्ण योजना आरंभीपासूनच ऑनलाईन पद्धतीने राबवण्यात आली. तथापि या योजनेची कार्यवाही करण्यासाठी शासकीय पातळीवर कुठलीही पूर्वसिद्धता नव्हती. याचाच पुरेपूर अपलाभ सरकारी कर्मचाऱ्यांनी घेतला. खरे तर सरकारी सेवेत असणाऱ्या व्यक्तींना स्वतःचे उत्पन्न, सेवा, अटी आणि अशा योजनांची पात्रता निकष यांची पुरेपूर माहिती असते. तरीही त्यांनी नियम पायदळी तुडवून या योजनेचा लाभ घेणे, हा अधिक गंभीर गुन्हा आहे. दुसरे म्हणजे या योजनेसाठी जेव्हा ऑनलाईन अर्ज केले जात होते, तेव्हा अर्ज स्वीकृत करणारी पडताळणी यंत्रणा झोपा काढत होती का? शासनाकडे कर्मचारी वेतन, सेवा नोंदी, निवृत्तीवेतन आदी विविध माहिती उपलब्ध असतांनाही सरकारी कर्मचारी लाभार्थी सूचीत कसे आले? याचा अर्थ तांत्रिक प्रणाली अपुरी होती किंवा संबंधित विभागांनी आवश्यक ती दक्षता घेतली नाही. बोगस लाभार्थ्यांचा आकडा ८१ लाख आहे. त्यामुळे 'प्रशासनाने जसे स्वतःच्या ५ लाख बोगस लाभार्थ्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले, तसेच ८१ लाख बोगस लाभार्थ्यांकडेही दुर्लक्ष केले', हे उघड आहे. त्यामुळेच तर जो अर्ज करील, त्याचा अर्ज संमत होत होता. हा कुंपणाने शेत खाण्याचा प्रकार आहे. या संपूर्ण प्रकरणामध्ये चूक केवळ प्रशासनाची नाही, तर सरकारचीही आहे. सरकारने विविध विभागांची माहिती एकत्रित करून पात्रता पडताळण्यासाठी सक्षम यंत्रणा निर्माण करणे अपेक्षित होते. आधार क्रमांक, पॅन कार्ड क्रमांक, सेवा नोंदी आदी माहितीची शासकीय माहितीशी तुलना केली असती किंवा पडताळले असते, तरी ही 'प्रशासकीय घुसखोरी' आरंभीच रोखता आली असती. ही संख्या ५ लाख होईपर्यंत सरकारच्या लक्षात कसे आले नाही? निवडणुकीत दिलेल्या आश्वासनाप्रमाणे ही योजना घाईघाईत चालू करण्यात आली. त्यामुळे योजनेच्या कार्यवाहीतील अचूकता, पारदर्शकता आणि पडताळणी यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले, असे या प्रकरणावरून दिसून येते. ही फसवणूक रोखण्यासाठी सरकारने 'ई-केवायसी' (इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ओळख पटवणे) प्रक्रिया चालू केली आणि हा भयानक प्रकार उघड झाला, अन्यथा ही लूट अशीच चालू राहिली असती. वस्तूतः फसवणूक झाल्याची कुणकुण सरकारला केव्हाच लागली होती; पण ती उघड व्हायला एवढा वेळ का लागला? हे मात्र कळायला मार्ग नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या योजनेचा अपलाभ घेणाऱ्यांकडून पैसे वसूल करणार असल्याचे सांगितले आहे. तथापि सरकारने केवळ वसुली करून थांबू नये, तर संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल करावी. खोटी माहिती देऊन अपलाभ घेतलेल्या सरकारी कर्मचाऱ्यांवर जराही दयामाया न दाखवता त्यांना तात्काळ बडतर्फ करून कारागृहात टाकावे, तरच भविष्यात सरकारची अशी फसवणूक करण्याचा विचारही सरकारी कर्मचाऱ्यांच्या मनात येणार नाही. यासमवेतच या प्रकरणासाठी उत्तरदायी असणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचीही चौकशी झाली पाहिजे. लाखो अपात्र लाभार्थी लाभ घेत असतांना संबंधित अधिकारी झोपले होते का? पडताळणी प्रक्रियेतील त्रुटींसाठी वरिष्ठ उत्तरदायी अधिकाऱ्यांनाही कारागृहात टाकले पाहिजे. अशा प्रकरणांमध्ये कारवाई केवळ कनिष्ठ अभियंता, कर्मचारी यांच्यावरच कारवाई होते; पण मोठे उत्तरदायी अधिकारी मात्र मोकाट असतात. असे चित्र या प्रकरणात दिसू नये, अन्यथा सरकारला आणखी टीकेला सामोरे जावे लागेल. सरकारची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली, तरच शासनव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकून राहील. सरकारने अपात्र लाभार्थी महिलांकडून पैसे वसूल न करण्याची; पण अपात्र लाभार्थी असलेल्या पुरुषांकडून पैसे वसूल करण्याची घोषणा केली. खरेतर सरकारने ५ लाख कर्मचाऱ्यांसह सर्व ८१ लाख अपात्र लाभार्थ्यांनी सरकारला चुना लावला आहे. त्यांची नावे उघड करून त्यांच्याकडून ही रक्कम सव्याज वसूल करून त्यांना कारागृहात टाकले पाहिजे. जर सरकार लाखो अपात्र लाभार्थी महिलांकडून पैसे वसूल करणार नसेल, तर त्याचा भुर्दंड सामान्य जनतेने का म्हणून सोसायचा? त्यामुळे सरकारने एकतर त्यांच्यावर कारवाई करून ही रक्कम सव्याज वसूल करावी किंवा सर्व आमदारांनी मिळून ही रक्कम स्वतःच्या खिशातून भरावी. सर्वसामान्यांच्या जिवावर ही 'फसवणूक माफी' नको. या घटनेतून एक गोष्ट स्पष्ट होते की, केवळ लोकप्रिय योजनांची घोषणा करून काहीही साध्य होत नाही. त्यासाठी पारदर्शक प्रशासन, सक्षम पडताळणी व्यवस्था, पाठपुराव्याची व्यवस्था आदींची व्यवस्था प्रथम करणे आवश्यक असते. अन्यथा अशा योजना या गरजूंना साहाय्य करण्याऐवजी संधीसाधू लोकांच्या कमाईचे साधन बनतात. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेतील हा प्रकार शासनासाठी मोठा धडा आहे. डिजिटल प्रणाली कितीही आधुनिक असली, तरी ती वापरणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा नसेल, तर सरकारचीच विश्वासार्हता धुळीस मिळते, हे सरकारने लक्षात घेतले पाहिजे!

हवामान अरिष्ट नि स्वार्थ

जग हवामान बदलामुळे गंभीर संकटात आहे. मानवी हस्तक्षेपामुळे निसर्गाचा विध्वंस होत आहे. यावर मात करण्यासाठी गांधीजींच्या विचारांनुसार निसर्गावर आधारित जीवनशैली आणि विकेंद्रित अर्थव्यवस्था आवश्यक आहे.



आजमितीला अवघे जग निसर्ग व्यवस्थेचा विध्वंस, आर्थिक विषमता व सामाजिक-धार्मिक विसंवादाने त्रस्त आहे. २१ व्या शतकात जग विरोधाभासाच्या गर्तेत जखडत अधिकाधिक युद्धखोर, हिंस्र, अस्थिर, अगतिक व अमानवीय होत असल्याची खंत बहुसंख्य जनतेला आहे. जगभरचे वैज्ञानिक, साहित्यिक, कलावंत, समाजधुरीण व तत्त्वचिंतक पृथ्वी आणि समस्त जीवसृष्टीच्या सुरक्षेबाबत चिंतेत आहेत. विशेषतः हवामान अरिष्ट दिवसेंदिवस गंभीर होत असून अस्तित्वाचे संकट आ वासून आहे. मानवापुढचे हे अव्वल आव्हान आहे.

गत सात ते आठ दशकांत वैज्ञानिकांच्या संशोधनामधून अधोरेखित होते, की मानवीकृत तापमानवाढीला आवर घातल्याखेरीज मानवासह यच्चयावत जीवांचे अस्तित्व, भरणपोषण सुरक्षित राहणार नाही. या तापमानवाढीचे मुख्य कारण आहे हरितगृहवायू. जीवाश्म इंधनाच्या वापरामुळे कार्बन आणि अन्य विषारी वायूंच्या उत्सर्जनामुळे ही स्थिती ओढवली आहे. या संदर्भात एक ठळक बाब लक्षात घेतली पाहिजे की, गत ५० वर्षांत जेवढी नैसर्गिक संसाधने वापरली गेली, ती मानव इतिहासात आजवरच्या पिढ्यांनी वापरलेल्या एकंदर संसाधनापेक्षा अधिक आहेत. परिणामतः पृथ्वीचे तापमान जे दीर्घ काळ स्थिर होते, ते आद्योगिक क्रांतीपूर्व काळाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सियसने वाढले. २०१५च्या पॅरिस करारानुसार हे त्या पातळीवर रोखण्याची गरज जगाने मान्य केली होती. मात्र, तापमानवाढ अनुमानापेक्षा अधिक वेगाने होत असून २०३५ साली तापमानाचा पारा जेथे पोहचणार होता, तो आजच तेथे पोहचला आहे!

या प्रश्नाचा विचार व्यापक संदर्भात केल्याखेरीज त्याची कायमस्वरूपी सोडवणूक होऊ शकत नाही. आज जगातील ८०० कोटी लोक दोनेकशे देशांत राहतात, जी 'सार्वभौम राष्ट्रे' आहेत. मात्र, हे लक्षात ठेवले पाहिजे की या सर्वांचा अधिवास पृथ्वी आहे. ती एकसंघ जैवव्यवस्था आहे. कोणताही एक देश, राष्ट्र हे स्वायत्त भूराजकीय घटक असले तरी पूर्णतः स्वयंभू नाही. हे भान राखून हा ग्रह सर्वांचे सामाईक घर, जीवनाधार आहे, हे भौतिक वास्तव विसरता कामा नये. पृथ्वीची घटक पंचतत्त्वे अमीबापासून मानवापर्यंतच्या समस्त जीवसृष्टीचा पाया आहेत. मात्र, निसर्गरचनेत अविवेकी, अवास्तव व अनाठायी हस्तक्षेपामुळे आजचे हवामान अरिष्ट ओढवले असून त्याला रोखणे सर्व देशांची व मानवसमूहाची संयुक्त जबाबदारी आहे.

औद्योगिक क्रांतीनंतर व गत शंभर दीडशे वर्षांत ज्या वेगाने पृथ्वीची संसाधने बरबाद केली जात आहेत, त्याचे कारण निरर्थक वाढवृद्धी व चंगळवाद हे आहे. पृथ्वीच्या धारणक्षमतेच्या मर्यादा ओलांडल्या जात असून दर वर्षी पुनःनिर्मिती क्षमतेपेक्षा अधिक वापर होत असल्यामुळे असंतुलन अरिष्ट वाढून साऱ्या जगाला भीषण आपत्तीला सामोरे जावे लागत आहे. याचा सामूहिकपणे सम्यक विचार न करता कमी-अधिक प्रमाणात सर्व सत्ताधारी वर्ग अनिर्बंध आयात-निर्यात करण्यास विकास मानून हे कुचक्र रेटत आहे.

दैनंदिन गरजेच्या अन्न, वस्त्र, निवारा आरोग्य व शिक्षण या वस्तू व सेवासुविधांची अनेकदा पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अकारण वाहतूक सुरू आहे. दुर्मीळ जीवनावश्यक वस्तूंमध्ये औषधे, मसाले यांची स्थानिक उपलब्धता होऊ शकत नसेल तर शक्य तितक्या कमी अंतरावरून देवाणघेवाण होऊ शकते. मात्र, सर्वसाधारण गरजेच्या वस्तूंची हजारो किलोमीटर अंतरावरून वाहतूक करणे हा वेडेपणा आहे. याची किंमत म्हणजे हवामान अरिष्ट. सोबतच, जीवाश्म इंधनाचा वापर म्हणजे विनाशाकडे वाटचाल. लोभ, हव्यास व छानछौकीसाठी आपण पर्यावरणावर मोठा आघात करत आहोत, याची जाण व भान कुठेही दिसत नाही.

आज आयात-निर्यात होत असलेले ९० टक्के साहित्य हे त्या त्या देश व परिसरात उत्पादन होऊन स्थानिकरीत्या उपलब्ध होऊ शकते. जीवन सुकरपणे जगण्यासाठी लागणारी किमान संसाधने निसर्गाने सर्वत्र दिली आहेत, त्यामुळे तर मानवाने तेथे वस्ती केली. मानव समाजाच्या सातशेहून अधिक पिढ्यांचा इतिहास ज्ञात आहे. त्यातून आजच्या केवळ दहा पिढ्यांच्या आधी लोक कसे जीवन जगत होते, काय खातपीत होते, कसे राहत, कसा प्रवास करत, वस्तू कशा बनवत याचा विचार केला तर जागतिकीकरणाच्या अनाठायी वाहतुकीचे व्यर्थ्य लक्षात येईल. तथाकथित आधुनिक जीवनशैली निसर्ग व मानवाचा घात करील, हे महात्मा गांधी यांनी अत्यंत द्रष्टेपणाने हेरले होते. आज जगाला त्यांच्या निसर्गकेंद्री विकासप्रणाली व जीवनशैलीची नितांत गरज आहे. गांधीजींनी निरर्थक ह्यावाढवृद्धीप्रवण पागलदौडङ्घ (या शीर्षकाचा सेवाग्राम आश्रमात फलक आहे.) थांबवण्याची हाक रोखठोक शब्दांत जगाला दिली आहे.

ट्रम्प जगाला जो आयात शुल्क चाबूक दाखवत आहे, त्याला चांगली सकारात्मक कलाटणी देत जगभर विकेंद्रित, स्थानिक गरजांनुरूप परिसरातील संसाधने व श्रमाच्या साह्याने स्वावलंबी अर्थव्यवस्था उभी केली जाऊ शकते. खेडे व जग, देश व दुनियेचे नाते, सहसंबध काय याविषयी गांधीजी म्हणतात : 'खेडं अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने माझं जग आहे तर संस्कृतीसाठी जग हे माझे खेडं आहे'. खेड्यांची त्यांची कल्पना समोरासमोर (फेस टू फेस) समाज अशी आहे. त्यांच्या मते जीवनाश्यक मूलभूत गरजांची पूर्तता परिसरातील संसाधने, श्रम व कौशल्य आधारित असावी. तर ज्ञानविज्ञान, कला, साहित्य, संगीत, मैत्री हे सर्व वैश्विक असतील.

आजच्या डिजिटल तंत्रज्ञानाने संप्रेषण व संचाराच्या कक्षा खूपच विस्तारल्या आहेत. त्याचा योग्य विनियोग करून सेंद्रिय शेती, स्थानिक उत्पादन करून सर्व गरजा सुलभ व अहिंसक पद्धतीने पूर्तता करणारा समतामूलक शाश्वत विकास हाच जगाला सर्वनाशापासून वाचविणारा उपाय-पर्याय आहे. भौतिक हावहव्यास नैतिक परिपूर्तीच्या आड यावयास नको.

निती व परिस्थितिकी शाश्वत ठेवणारी अर्थरचना ही आज काळाची गरज आहे. संकुचित स्वार्थ, नफेखोरी, चंगळवाद, निसर्गाला उपभोग्य वस्तू लेखण्याची वृत्ती याचा संचयी व चक्राकार परिणाम म्हणजे आजची धनदांडगेशाही! एकटे ट्रम्पच नव्हे तर देशोदेशींचे मस्तवाल सत्ताधीश निसर्गाला व मानव समाजाला कच्चामाल मानून मनमानीपणे यांच्यावर अधिसत्ता गाजवत आहेत. याला पर्याय म्हणजे खरीखुरी सहभागीत्वाची लोकशाही. यासाठी विवेकहीन वाढवृद्धी नावाचे जे भूत जगाच्या मानगुटीवर बसले त्याचा अव्हेर करणे आवश्यक आहे. तारतम्यविरहित वाढवृद्धी हा विकास नसून विनाश आहे. निरर्थक वस्तूंचा फाफटपसारा, अभद्र बडेजाव, 'वापरा, फेका' वृत्ती पूर्णतः निषिद्ध मानावी. त्याला प्रतिष्ठा तर नसावीच; परंतु व्यापारीकरण, विकृतीकरणाला समाजविघातक कृती म्हणून त्याचा धिःक्कार केला जावा.

सारांशरूपाने असे म्हणता येईल, की यापुढे जगात अतिरिक्त उत्पादनासाठी अधिक संरचना उभी न करता आहे ती संरचना व संसाधने निगुतीने वापरून सर्वांच्या गरजा भागविल्या जाऊ शकतात. अधिक वाढविस्तार नव्हे, तर सद्य संरचनेची फेरजुळवणी, फेरवाटप व शास्त्रीय विनियोग यास मोठा वाव आहे. यासाठी पृथ्वीवरील संसाधने - मग ती कोणत्याही राष्ट्राच्या सीमेत असोत; संपूर्ण मानव समाजाचा तो सामूहिक वारसा असून त्याचा विनियोग सर्वांच्या सकल हितार्थ होणे ही आजच्या क्षणाची गरज आहे.

बुडीत कर्जांना कर्जदारासोबत बँकाही जबाबदार...



जेव्हा एखादे मोठे कर्ज बुडते, तेव्हा केवळ त्या कर्जदाराच्या मालमत्तेवर जप्ती आणून प्रश्न सुटणार नाही. ज्या अधिकाऱ्यांनी डोळे झाकून, पुरेशी शहानिशा न करता, या कर्जाच्या फायली मंजूर केल्या आहेत, त्यांचीही चौकशी व्हायला हवी. त्यांच्यावरही जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई झाली पाहिजे. जोपर्यंत अधिकारी स्तरावर ही जबाबदारी निश्चित होत नाही, तोपर्यंत ह्यबँकेचा पैसा म्हणजे कोणाचीही मालकी नसलेला पैसाह ही प्रवृत्ती बदलणार नाही. सर्वोच्च न्यायालय जेव्हा असे म्हणते, त्यावेळी त्याचे महत्त्व जास्त असते.

कर्ज घ्यायचे की नाही, याबद्दल प्रत्येकाची वेगवेगळी मते असतात. काहींना वाटते की कर्ज घेऊ नये, तर काहींना छोट्या छोट्या गोष्टींसाठी पण कर्ज काढायला आवडते. जर एखादा मोठा व्यवसाय सुरू करायचा असेल, तर कर्ज काढण्याशिवाय गत्यंतर नसते. कर्ज काढणे हे ग्राहकांसाठी जितके गरजेचे असते, तितकेच ग्राहकांनी कर्ज घेतले पाहिजे, यासाठी बँकाही प्रयत्नशील असतात. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून बँकिंग क्षेत्राकडे पाहिले जाते. देशाच्या आर्थिक विकासात आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रगतीत बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. परंतु, अलीकडच्या काळात बँकांचे वाढते बुडीत कर्ज हा देशाच्या अर्थव्यवस्थेपुढील एक गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. जेव्हा एखादी मोठी कंपनी किंवा व्यावसायिक घेतलेले कर्ज बुडवतो, तेव्हा सर्वसाधारणपणे फक्त त्या कर्जदारालाच जबाबदार धरले जाते आणि त्याच्या नावाने बोटे मोडली जातात. मात्र, या प्रक्रियेत कर्ज वाटप करणारी बँक आणि तिचे अधिकारी यांची कोणतीच चूक नसते का? सर्वोच्च न्यायालयाने गेल्या महिन्यात एका खटल्यावर निकाल देताना या ज्वलंत प्रश्नाला हात घातला. न्यायालयाने बँकांच्या कार्यपद्धतीवर ओढलेले ताशेरे बँकिंग व्यवस्थेतील एका मोठ्या आणि कटू सत्यावर प्रकाश टाकणारे आहेत.

सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेला खटला एका कंपनीच्या कर्ज थकबाकीशी संबंधित होता. या प्रकरणात संबंधित कंपनीने बँकेकडून तब्बल आठ कोटी रुपये एवढे मोठे कर्ज घेतले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एवढी मोठी रक्कम कर्ज म्हणून घेतल्यानंतर या कंपनीने कर्जाचा पहिला हप्तादेखील बँकेकडे भरला नाही आणि तेव्हापासून बँकेला एक छदामही परत केला नाही. अशा परिस्थितीत, केवळ तो कर्जदारच गुन्हेगार ठरत नाही, तर बँकही तेवढीच दोषी ठरते, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

न्या. असनुद्दिन अमानुल्ला आणि न्या. आर. महादेवन यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत स्पष्ट शब्दांत नमूद केले की, एवढ्या मोठ्या रकमेचे कर्ज मंजूर करताना बँकेच्या अधिकाऱ्यांकडून मोठा निष्काळजीपणा झाला आहे. कर्ज घेतल्यानंतर कर्जदार जर पहिल्याच हप्त्यापासून थकबाकीदार होत असेल, तर याचा सरळ आणि स्पष्ट अर्थ असा होतो की, बँकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी कर्जदाराची कर्ज परतफेड करण्याची आर्थिक क्षमता योग्य प्रकारे तपासलेलीच नाही. कोणत्याही कंपनीला किंवा व्यक्तीला कर्ज देताना त्यांच्या आर्थिक ताकदीचे, त्यांच्या व्यवसायाच्या संभाव्य यशाचे आणि त्यांच्या पतदर्जाचे सखोल मूल्यमापन करणे हे बँकेचे आद्य कर्तव्य असते. परंतु, या प्रकरणात असे कोणतेही योग्य मूल्यमापन झाले नसल्याचे दिसत आहे, असे न्यायालयाने नमूद केले.

जेव्हा एखादी मोठी बँक कोट्यवधी रुपयांचे कर्ज मंजूर करते, तेव्हा त्यामागे एक मोठी प्रक्रिया असते. अनेक अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आणि समित्यांच्या मान्यता या प्रक्रियेत अंतर्भूत असतात. तरीही, जर एखादी कंपनी कर्ज घेतल्यावर पहिला हप्ताही देऊ शकत नसेल, तर बँकेच्या या संपूर्ण 'रिस्क असेसमेंट' प्रणालीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते.

न्यायालयाच्या या निकालातील सर्वात महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा हा आहे की, 'कर्ज बुडाल्याबद्दल केवळ कर्जदारालाच सर्वस्वी जबाबदार धरता येणार नाही.' बँकेने कर्ज देण्यापूर्वी पुरेशी शहानिशा न केल्यामुळे बँक आणि तिचे अधिकारीही या नुकसानीला तितकेच जबाबदार आहेत. कर्जदाराने कर्ज मागितले म्हणजे ते द्यायचेच, असे बँकिंगचे तत्त्व नाही. ग्राहकाची आर्थिक पार्श्वभूमी, त्याचा व्यवसाय, बाजारातील स्थिती आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, भविष्यात हे कर्ज व्याजासकट परत करण्याची कर्ज मागणाऱ्या व्यक्तीची किंवा कंपनीची वास्तविक क्षमता याचा सखोल अभ्यास बँकेने करणे बंधनकारक आहे. जेव्हा बँक हा अभ्यास करण्यात कुचकामी ठरते, तेव्हा ती स्वतःच बुडीत कर्जाच्या खड्ड्यात पाय घसरून पडते. सर्वोच्च न्यायालयाने या निकालामध्ये आणखी एका गोष्टीवर बँकांना खडेबोल सुनावले. बँकांचे कर्ज देण्यासंबंधीचे धोरण कसे दुटप्पी असते, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले.

मोठ्या कंपन्यांना कोट्यवधी रुपयांची कर्जे देताना बँका आणि त्यांचे काही अधिकारी अत्यंत निष्काळजी आणि बेपर्वा भूमिका घेतात. मोठ्या उद्योगपतींसाठी बँकेचे नियम जणू काही रबरासारखे ताणले जातात. त्यांच्यासाठी या बँका पायघड्या घालून कर्ज देण्यासाठी सज्ज असतात. पण दुसरीकडे, जेव्हा एखादा सर्वसामान्य माणूस आपल्या वैयक्तिक गरजांसाठी, जसे की घर घेण्यासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी किंवा एखादा छोटा व्यवसाय सुरू करण्यासाठी बँकेत जातो, तेव्हा त्याला अतिशय जाचक आणि कठोर अटींचा सामना करावा लागतो. सर्वसामान्यांना कर्जासाठी रांगा लावाव्या लागतात, अनेक कागदपत्रांची पूर्तता करावी लागते आणि एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर चकरा माराव्या लागतात. ही प्रक्रिया इतकी क्लिष्ट आणि थकवणारी असते की ती एका मर्यादेनंतर मानसिक छळाच्या पातळीवर पोहोचते. हा विरोधाभास संतापजनक आहे. अनेकांनी बँकांच्या या दुटप्पी वागण्याचा अनुभव घेतला आहे. ज्या सर्वसामान्य माणसाची कर्ज बुडवण्याची मानसिकता नसते आणि जो प्रामाणिकपणे हप्ते भरतो, त्याला कजार्साठी बँका अक्षरशः रडवतात. आणि दुसरीकडे, जे मोठे धेंड पहिल्या दिवसापासूनच कर्ज बुडवण्याच्या तयारीत असतात, त्यांना मात्र लाल गालिचा अंथरून कोट्यवधी रुपयांची खैरात वाटली जाते. हा अन्याय आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने याच अन्यायावर अत्यंत अचूक प्रहार केला आहे.

बँकांचा कारभार असाच चालू राहिल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. न्यायालयाने या प्रकारच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली असून, भविष्यात आवश्यक वाटल्यास बँकांच्या अशा कार्यपद्धतींविरुद्ध विशिष्ट आदेश देण्याचे संकेतही दिले आहेत. बँकांनी कर्ज देण्याचे नियम शिथिल करावेत, असे अजिबात नाही. उलट, कर्जाचे निकष ठरवण्याचा अधिकार रिझर्व्ह बँक आणि संबंधित बँकांचाच आहे. परंतु, ही प्रक्रिया सर्वसामान्य कर्जदारांसाठी अधिक सोपी आणि न्याय्य असायला हवी. त्याचबरोबर, तळागाळातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना जास्तीत जास्त फायदा मिळावा यासाठी धोरणांची योग्य आखणी होणे गरजेचे आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, जेव्हा एखादे मोठे कर्ज बुडते, तेव्हा केवळ त्या कर्जदाराच्या मालमत्तेवर जप्ती आणून प्रश्न सुटणार नाही. ज्या अधिकाऱ्यांनी डोळे झाकून, पुरेशी शहानिशा न करता, या कर्जाच्या फायली मंजूर केल्या आहेत, त्यांचीही चौकशी व्हायला हवी. त्यांच्यावरही जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई झाली पाहिजे. जोपर्यंत अधिकारी स्तरावर ही जबाबदारी निश्चित होत नाही, तोपर्यंत 'बँकेचा पैसा म्हणजे कोणाचीही मालकी नसलेला पैसा' ही प्रवृत्ती बदलणार नाही. सर्वोच्च न्यायालय जेव्हा असे म्हणते, त्यावेळी त्याचे महत्त्व जास्त असते.

सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल बँकिंग क्षेत्रासाठी एक सणसणीत चपराक आणि धोक्याचा इशारा आहे. कर्ज घेणाराच नेहमी चोर नसतो, तर डोळ्यांवर पट्टी बांधून कर्ज वाटणाराही गुन्हेगार असू शकतो, हे या निकालाचे मर्म आहे. सगळ्याच बँकांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालातून जागे होण्याची वेळ आली आहे. सर्वसामान्यांना कर्जाच्या रांगेत उभे करून छळण्यापेक्षा, कंपन्यांना आणि बड्या लोकांना कर्ज देण्यापूर्वी त्यांच्या आर्थिक क्षमतेचा अभ्यास बँकांनी केला पाहिजे. जर असे घडले तरच बँकिंग व्यवस्थेतील जनतेचा विश्वास टिकून राहील, नाहीतर पुन्हा पहिले पाढे पंचावन्न असेच होत राहील.



किती वागवावे ओझे विकासाचे?

मुंबईसह महानगरातील लोकसंख्या, वाहने आणि इमारती वाढल्या पण रस्ते तेवढेच आहेत. शहराची भारवाही क्षमता किती आहे याचा वस्तुनिष्ठ आराखडा मांडणे गरजेचे आहे.

अलीकडेच कल्याण रेल्वे स्थानकातून शहराकडे जाणे झाले. पूर्वी स्थानकातून उतरताच दृष्टीस पडणारे एसटी स्थानक आता शोधावे लागत होते. स्थानक परिसर म्हणजेच नव्या सॅटिसचे पूल डोक्यावर उभे राहत होते. खाली रिक्षांचा डोके भणभणवणारा आवाज. शहराची ओळख असणारे टांगे लुप्त झाले होते. कल्याणमधील सनदी अधिकारी, शहरनियोजक यांच्याशी या स्थितीबाबत चर्चा सुरू असताना, त्यांनी एकच प्रश्न केला... लोक वाढले, गाड्या वाढल्या, वाड्यांच्या इमारती झाल्या, पण रस्ते तर तेवढेच आहेत; तेच रस्ते शहराचा सगळा भार कसा वागवणार? शहराची कॅरिंग कपॅसिटी कशी वाढवणार? जी गोष्ट कल्याणची, तीच मुंबईची आणि तीच ठाणे, वसई-विरार किंवा मुंबई महानगरातल्या आणखी कुठल्याही शहराची. शहराची नेमकी कॅरिंग कपॅसिटी म्हणजेच भारवाही क्षमता किती, याचा वस्तुनिष्ठ आराखडा आपण मांडतो का? गेल्या वर्षी उच्च न्यायालयामध्ये कॉन्झर्वेशन ॲक्शन ट्रस्टने यासंबंधी जनहित याचिका दाखल केली होती. मुंबईतील पायाभूत सुविधा, विकास, उपलब्ध साधनस्रोत यांचा विचार करून शहराची भारवाही क्षमता मांडणारा एक समग्र अहवाल तयार करावा व नगरनियोजनात त्याचा समावेश करावा, अशी ही याचिका होती. त्यावर न्यायालयाने राज्य सरकार, मुंबई महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ आदींना नोटिसा धाडल्या. सन २००६ मध्ये कॉन्झर्वेशन ॲक्शन ट्रस्टने अशा प्रकारचा संशोधन अहवाल जारी केला होता. मुंबईच्या विकास आराखड्यात अशा क्षमतेला अनुसरूनच भविष्यकालीन विकास अपेक्षित होता. प्रत्यक्षात हे आराखडे, भूभागांवरची आरक्षणे यात बदल करण्याचे प्रस्ताव महापालिकांमध्ये वारंवार येत असतात, हे लक्षात घ्यायला हवे. मुंबई किंवा कोणत्याही महापालिका क्षेत्रांमध्ये चटईक्षेत्र निदेर्शांक ही संकल्पना खरेतर भारवाही क्षमतेला अनुसरूनच तयार करण्यात आली होती. प्रत्येक भूभागाची रहिवासी, व्यापारी आस्थापना, वाहने, सांडपाणी, घनकचरा या सर्व सुविधा यांचा विचार या चटईक्षेत्र निदेर्शांकात अपेक्षित असतो. प्रत्यक्षात तसे घडत नाही. राहणीमानाचा दर्जा उंचावण्याची प्रत्येकाची आस या एकमात्र निकषावर शहरातील विकासाचा उद्योग धावत असतो. ५०-५० वर्षे जुन्या इमारतींमधील एखाद्या खोलीत दिवस काढलेल्या कुटुंबांना अधिकचा चटईक्षेत्र निदेर्शांक आणि वाढीव सदनिकांच्या विक्रीतून विनामूल्य सदनिका मिळण्याची सुविधा हाच एकमेव आधार असतो. मूळ सदनिका, वाढीव सदनिका तसेच नव्याने उभी राहणारी संकुले यांचा किती भार त्या विशिष्ट संकुलाला सोसवतो, याची गणती करायची कशी, हा प्रश्न आहे. त्यातही जे लोक नियम पाळणार आहेत, त्यांच्यासाठी या भारवाही क्षमतेचे, चटईक्षेत्र निदेर्शांकाचे, संकुलांपुढील सहा-नऊ मीटर रस्त्यांचे, अग्निशमन सुविधांचे नियम असतात. ते धाब्यावरच बसवणाऱ्यांना याच्याशी काही देणेघेणे नसते. कित्येकदा नियमांच्या कात्रीत अडकून अव्यवहार्य ठरलेल्या प्रकल्पात भरडले गेलेले रहिवासी शहरात दिसतात. तर त्याच वेळी या नियमांना हरताळ फासून उभे राहिलेले टोलेजंग मनोरे धनिकांचे 'आयकॉन' ठरतात. रेल्वे, पोर्ट ट्रस्ट, जिल्हाधिकारी यांच्या जागांवर होणारी अतिक्रमणे यांनाही शहराच्या भारवाई क्षमतेशी काही देणेघेणे नसते. शहराच्या विकासात बारा बलुतेदारांप्रमाणेच वेगवेगळे घटक आवश्यक असतात व किफायतशीर निवारा ही त्यांची गरज असते, याकडे आजवर दु

चाकवतची पळीवाढी भाजी

साहित्य : चाकवतची मध्यम आकाराची जुडी १, बेसन/हरभरा डाळीचे पीठ/मूगडाळ पीठ - २ ते ३ टेबलस्पून, दही - ३ ते ४ टेबलस्पून, मीठ - चवीनुसार, साखर- दोन चिमूट, हळद व तिखट - रंग येण्यापुरते, अर्धी मूठ शेंगदाणे भिजवून (ऐच्छिक), २-३ चमचे हरभरा डाळ भिजवून (ऐच्छिक).



फोडणीसाठी : साजूक तूप - २ टेबलस्पून, जिरे, हिंग, हिरवी मिरची उभी चिरून - १.

पाककृती : चाकवताची चांगली पाने निवडून, स्वच्छ धुऊन कूकरला किंवा बाहेर पातेल्यात पाणी घेऊन उकडून घ्यावीत. भिजवलेले शेंगदाणे व हरभरा डाळ घालणार असाल तर तेही शिजवून घ्यावेत. शिजलेला पाला गार झाला की निथळून त्यात अनुक्रमे बेसन आणि दही घालून मिक्सरला एकजीव बारीक करून घ्यावे. मिक्सरला बारीक करणे नको असेल तर रवीने एकजीव घुसळून घ्यावे. गुठळ्या राहता कामा नयेत. शिजलेले शेंगदाणे, हरभरा डाळही घालावी. हे मिश्रण गॅसवर जाड बुडाच्या कढईत किंवा पातेल्यात गरम करायला ठेवावे. हवे तितके पाणी घालून आपल्याला हवे तसे सरसरीत करून घ्यावे. बेसन शिजल्यावर भाजीला दाटपणा येतो. त्या अंदाजाने पाणी घालावे. चवीनुसार मीठ, दोन चिमूट साखर, रंगापुरती किंचित हळद व तिखट घालून भाजीला एक उकळी आणावी. जास्त अजिबात उकळायचे नाही. फोडणीसाठी लोखंडी पळी गॅसवर तापत ठेवावी. त्यात साजूक तूप घालून ते जरा तापले की लगेच जिरे टाकावे, ते तडतडल्यावर हिंग व मिरची घालून गॅस बंद करावा. फोडणी जरा गार झाली की भाजीखालचा गॅस बंद करून त्यात पळी फोडणीसकट अलगद बुडवावी. चुर्र आवाज झाला पाहिजे. फोडणी पळीने भाजीत नीट मिसळावी. भाजी उकळल्यावर गॅस बंद करून भाजीवर झाकण ठेवावे व भाजी जरा मुरू द्यावी. गरमागरम किंवा गार भाजी पोळी/भाकरी/भात/ब्रेडसोबत खावी.



'ई' जीवनसत्त्व सुंदर त्वचेसाठी वरदान



केसांचे सौंदर्य आणि त्वचेचे तेज वाढवणाऱ्या पोषक द्रव्यांमध्ये 'ई' जीवनसत्त्व हे सर्वात महत्त्वाचे घटक आहे. यामध्ये त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे गुण असून, त्वचा सदैव तरुण आणि सुंदर दिसण्याकरिता आवश्यक पोषक घटक आहे. 'ई' जीवनसत्त्वाच्या कॅप्सूल्समधील जेल नियमित चेहऱ्यावर लावल्यास किंवा केसांना लावल्यास त्वचा आणि केस दोन्हीही सुंदर बनतात.

मानसिक ताण, अपुरी झोप किंवा वाढते वय या पैकी कोणत्याही कारणांनी चेहऱ्यावर सुरकुत्या येऊ शकतात. त्वचा कोरडी पडत असली तरी सुरकुत्या येऊ लागतात. अश्या वेळी 'ई' जीवनसत्वाच्या कॅप्सूल मधील जेल नियमितपणे चेहऱ्यावर लावल्यास सुरकुत्या कमी होऊन कालांतराने नाहीशा होतात. रसायनयुक्त मेकअप वापरल्याने त्वचेमधील पेशींचे नुकसान होते. हे नुकसान ही 'ई' जीवनसत्वामुळे भरून निघण्यास मदत होते. तसेच 'ई' जीवनसत्व त्वचेला आर्द्रता देऊन त्वचेचा कोरडेपणा दूर करते.

'ई' जीवनसत्वाच्या वापराने त्वचेवर काही कारणाने आलेले व्रण किंवा ओरखडे लवकर भरून निघण्यास मदत होते. चेहऱ्यावरील व्रण किंवा डाग नाहीसे होण्याकरिता ' ई' जीवनसत्वाची कॅप्सूल अर्धी कापून त्यातील जेल व्रणावर लावावे. हा उपाय दररोज करावा. काही दिवसांनंतर डाग हलके झालेले दिसून येतील. 'ई' जीवनसत्वामुळे त्वचेतील कोलाजेनमध्ये वाढ होऊन व्रण लवकर नाहीसे होतील.

काही व्यक्तींच्या चेहऱ्यावर पिग्मेंटेशनमुळे काळे डाग येतात. काहींच्या बाबतीत हे पिग्मेंटेशन फारच जास्त असते. 'मेलानिन 'हा घटक त्वचेला रंग देणारा आहे. हा घटक जेव्हा मोठ्या प्रमाणात त्वचेखाली एकाच ठिकाणी गोळा होतो, तेव्हा काळसर डाग आल्याप्रमाणे त्वचा दिसू लागते. अशा वेळी 'ई' जीवनसत्त्वातील जेल चेहऱ्यावर लावावे आणि त्याच्या जोडीने 'ई' जीवनसत्त्वाच्या कॅप्सूल्सचे सेवनही करावे. त्यामुळे हायपर पिग्मेंटेशन कमी होण्यास मदत होईल. काही व्यक्तींचे हात, कितीही मॉईश्चरायझर लावले तरीही सतत कोरडेच पडत राहतात. तसेच थंडीच्या दिवसात ओठही फाटतात, टाचांना भेगा पडतात. या सगळ्यांवर उत्तम उपाय म्हणजे 'ई' जीवनसत्त्व. कॅप्सूलमधील जेल काढून घेऊन हातांना, ओठांना किंवा टाचांना लावल्यास कोरडेपणा दूर होण्यास मदत होते. तसेच सतत उन्हामध्ये वावरल्याने त्वचेला झालेले नुकसानही 'ई' जीवनसत्त्वाच्या वापरामुळे दूर होते.

'ई' जीवनसत्त्व त्वचेप्रमाणेच केसांच्या सौंदर्याकरिताही फायदेशीर आहे. प्रदूषणाचे, तीव्र उन्हाचे दुष्परिणाम आपल्या त्वचेप्रमाणेच केसांवरही होत असतात. त्यामुळे केस रुक्ष होणे, डोक्यात सतत खाज सुटणे, कोंडा होणे आणि केसगळती या तक्रारी वारंवार सतावू लागतात. या तक्रारी दूर करण्याकरिता 'ई' जीवनसत्वाच्या कॅप्सूलमधील जेल खोबरेल तेलामध्ये मिसळून हे तेल केसांना मुळापासून टोकापर्यंत लावावे. आठवड्यातून दोन वेळा हा उपाय करावा. यामुळे केसांना आवश्यक पोषण मिळून केसांचा कोरडेपणा किंवा केसगळतीही कमी होईल.

रोज वापरण्यात येणाऱ्या मेकअप ब्रशची स्वच्छता करणेही आवश्यक आहे. यात जमणारे अंश स्किन आणि आय इन्फेक्शनसाठी कारणीभूत ठरू शकतात. जाणून घ्या काही टिप्स –

आवश्यक आहे मेकअप ब्रशची सफाई



- मेकअप ब्रशमध्ये डस्ट, ऑईल आणि बॅक्टेरिया जमत असतात. म्हणून जितका ब्रशचा वापर असेल त्याप्रमाणे तो स्वच्छही केला गेला पाहिजे.
- एका बाऊलमध्ये दोन तृतीयांश पाणी आणि एक तृतीयांश व्हिनेगर टाकून ब्रश भिजवून ठेवा. काही वेळानंतर ब्रश पाण्यातून काढून स्वच्छ पाण्याने धुऊन टाका.
- आपण क्लिंजरने ब्रश स्वच्छ करू शकता. याने ब्रशची घाण बाहेर निघून जाते.

स्तनदा स्त्रियांनी हे खाणे टाळावे...

आई होणे हे प्रत्येक स्त्रीसाठी आनंदाची बाब असते. गरोदरपणात तसेच आई झाल्यावर म्हणजेच बाळाच्या जन्मानंतर स्त्रीला पोषक तत्त्वांची कमतरता भासते. त्यासाठी तिने संतुलित आणि पौष्टिक आहाराचे सेवन केले पाहिजे. जेणेकरून तिचे आणि बाळाचे आरोग्य सुदृढ राहील. बाळ जन्माअगोदर आणि जन्मल्यानंतर पण आपल्या आईवरच निर्भर असतो. कारण आई जे काही खाते ते तिच्या बाळास मिळते. त्यासाठी तिने समतोल आणि सकस आहार घ्यायला हवा, जेणेकरून बाळास काही त्रास होऊ नये. तुमच्या खानपानामध्ये केलेल्या एका चुकीने ही बाळाच्या आरोग्यास हानी होऊ शकते.

आई बाळास स्तनपान करवते, त्यामुळे तिच्या दुधातून बाळाला आहार मिळत असतो आणि तेच त्याच्या वाढीस लाभकारी असते. आईने आपल्या आहारात अरबटचरबट पदार्थांचा समावेश केल्यास बाळास त्रास होऊ शकतो. स्तनपान करत असलेल्या स्त्रियांनी आपल्या आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश करायला नको ते जाणून घेऊ या...

- आपल्या जेवणात उडीद डाळ किंवा त्यापासून बनवलेले पदार्थ खाणे टाळावे यामुळे पोटात गॅस होतो आणि त्यामुळे बाळास त्रास होऊ शकतो. बाळाचे पोट दुखू शकते.
- साखरेपासून बनवलेल्या पदार्थांचा वापर कमी करावा. जास्त गोड खाण्याने बाळास भविष्यात मधुमेहाचा त्रास होण्याची दाट शक्यता असते.
- बाहेरचे खाणे जसे चिप्स, शीतपेय, पिझ्झा, बर्गर खाणे टाळावे. बाळाला पोट दुखणे, हगवणीचा त्रास तसेच स्थूलपणाचा त्रास होऊ शकतो.
- तेलकट पदार्थांचे सेवन करू नये. त्यामुळे बाळाच्या लिव्हरला त्रास होऊ शकतो.



पाठवलेला ई-मेल पोहोचण्याच्या आधीच डिलीट कसा करायचा? समोरच्या व्यक्तीलाही कळणार नाही

जीमेलवरून पाठवलेला ई-मेल अनसेंड करता येतो. जीमेलमध्ये हा पर्याय मिळतो आणि त्याची वेळ वाढवून तुम्ही रिसिव्हरच्या मेलबॉक्समध्ये गेलेला ई-मेल देखील मागे घेऊ शकता.

व्हॉट्सॲप आणि फेसबुक मेसेंजरसारखे ॲप्स येण्यापूर्वी ई-मेल्स खासगी तसेच बिझनेस कम्युनिकेशनचा महत्त्वाचा भाग होते. त्याव्यतिरिक्त ऑनलाइन कनेक्ट होण्याचा दुसरा पर्याय उपलब्ध नव्हता. आजही अनेक कॉर्पोरेट आणि गव्हर्नमेंट विभागदेखील ई-मेल कम्युनिकेशनचा वापर करतात. परंतु जर तुम्ही चुकीच्या ई-मेल ॲड्रेसवर ई-मेल पाठवला तर? किंवा पाठवलेल्या ई-मेलमध्ये चुका असतील तर? काळजी करू नका! आम्ही तुम्हाला असे उपाय सांगितले आहेत ज्यांच्या मदतीनं तुम्ही ई-मेल किंवा जीमेल मेसेज सहज अनसेंड करू शकता.

अँड्रॉइड डिव्हाइसवरून ई-मेल अनसेंड कसा करायचा?

तुम्ही ई-मेल पाठवल्यानंतर लगेच तुम्हाला तळाला 'Sent' आणि 'Undo' असे दोन पर्याय दिसतात.

त्यातल्या 'Undo' वर टॅप करा.


आयओएस डिव्हाइसवर ई-मेल अनसेंड कसा करायचा?

- इथेही ई-मेल पाठवल्यावर तुम्हाला 'Sent' आणि 'Undo' असे दोन पर्याय दिसतील.
- त्यातील 'Undo' ऑप्शनवर टॅप करा.

कॉम्प्युटरवरून ई-मेल अनसेंड कसा करायचा?

तुम्ही लिहलेला ई-मेल पाठवल्यावर लगेचच तुम्हाला खाली 'Message sent' टॅब दिसते आणि 'Undo' किंवा 'View message' असे पर्याय दिसतील. 'Undo' वर क्लिक करा.

नोट : तुमच्यकडे ई-मेल कॅन्सल किंवा अनसेंड करण्यासाठी ५ ते ३० सेकंदांचा कालावधी असतो.



महत्त्वाची माहिती

जीमेलमधील अनडू सेंड फीचर ई-मेल पाठवल्यावर अनसेंड करण्यासाठी कमीत कमी ५ तर जास्तीत जास्त ३० सेकंदाचा वेळ देतं. ही वेळ सुरुवातीपासून ५ सेकंद असते जी तुम्ही ३० सेकंदांपर्यंत वाढवू शकता.

ई-मेल अनसेंड करण्याचा कालावधी कसा वाढवायचा?

- तुम्ही अगदी सहज ई-मेल अनसेंड करण्याचा कालावधी वाढवू शकता. त्यासाठी तुम्हाला पुढील स्टेप्स फॉलो कराव्या लागतील.
- तुमच्या कॉम्प्युटरवरून जीमेल ओपन करा.
- तिथे उजवीकडे वरच्या बाजूला सेटिंगवर क्लिक करा.
- तिथे ऑल सेटिंग ऑप्शन शोधा.
- त्यानंतर 'Undo send' ऑप्शनची निवड करा आणि ५ ते ३० सेकंदामधून तुमच्या सोयीचा पर्याय निवडा.
- खाली स्क्रोल करा आणि बदल सेव्ह करा.

अंडे तुमचे रक्षण करेल मधुमेह होण्यापासून



आजच्या घडीला कमी वयातच कित्येक लोकांना मधुमेह म्हणजे डायबेटिसचा त्रास होऊ लागला आहे. पण तुम्हाला जर अंडे खायला आवडत असेल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. तसे तर अंडे नेहमी खाल्ल्याने अनेक फायदे होतात. पण 'अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशन'मध्ये नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात असे समोर आले आहे की, एका आठवड्यात चार अंडी पुरुषांनी खाल्ली तर त्यांना टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता आठवड्यातून एकच अंड खाणाऱ्या पुरुषापेक्षा ३७ टक्क्यांनी कमी होते. जगभरात टाइप-२ मधुमेह चांगला वेगाने पसरत असून वर्ष १९८४ ते १९८९ च्या मधील ४२ ते ६० वयोगटातील २,३३२ वयोवृद्ध लोकांच्या खाण्या-पिण्याच्य सवयींचे पूर्व फिनलंड विश्वविद्यालयातील संशोधकांनी मूल्यांकन केले. त्यानंतर १९ वर्षे त्यांचा फॉलोअप घेतल्यानंतर ४३२ लोकांना टाइप-२ मधुमेह झाल्याचे आढळले. अभ्यासातून समोर आले की, अंड्याचे सेवन केल्याने टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता आणि रक्तात ग्लुकोज स्तर कमी झाला.

किचनमधील हे पदार्थ केवळ स्वाद नाही तर त्वचेची चमकदेखील वाढवतात

हरभरा पीठ आणि हळदीचा फेस पॅक

साहित्य :

- अर्धा किंवा एक चमचा हळद
- चार चमचे हरभरा पीठ
- दूध किंवा पाणी



वापरण्याची पद्धत :

- हरभरा पीठ आणि हळदीची पेस्ट बनवण्यासाठी पाणी किंवा दुधाचा वापर करा.
- ही पेस्ट चेहरा, मानेवर लावा आणि वाळू द्या. नंतर पाण्याने धुऊन घ्या.
- ही पेस्ट आठवड्यातून १ किंवा २ वेळा वापरली जाऊ शकते.

हे कसे कार्य करते?

हळदीत करक्युमिन नावाचे ॲंटीऑक्सिडेंट आढळतात आणि त्यात ॲंटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म असतात. हे त्वचेतील हानीकारक पदार्थ काढून आणि कोलेजनचे उत्पादन वाढवून त्वचेस तेजाळ करते.

टोमॅटो आणि चंदन पावडरचा फेस पॅक

पॅकसाहित्य :

अर्धा टोमॅटो, एक चमचा चंदन पावडर, चिमूटभर हळद

वापरण्याची पद्धत

- टोमॅटोमधील बिया काढाव्या.
- बिया नसलेल्या टोमॅटोत चंदनाची पावडर आणि हळद मिसळून त्याची पेस्ट करावी.
- ही पेस्ट चेहऱ्यावर लावून पंधरा मिनिटे तशीच राहू द्यावी. नंतर चेहरा पाण्याने स्वच्छ धुवावा.
- आठवड्यातून १ किंवा २ वेळा हा उपाय करता येऊ शकतो.



हे कसे कार्य करते?

टोमॅटोमध्ये व्हिटॅमिन सी जास्त प्रमाणात असते, त्यामुळे चेहरा सतेज होतो.



साखरेमुळे होणारे नुकसान

साखर मानव जीवनातील अविभाज्य अंग आहे आणि तिचा गोडवा जितका हवा हवासा वाटतो तेवढेच ते नुकसानदायकही आहे. जर आपल्यालाही साखर खाण्याची सवय असेल तर यापासून होणारे पाच नुकसान जाणून घ्या :



मधुमेह : आपल्या परिवारात कोणालाही डायबेटिस असल्यास आपण साखर कमी करावी. कारण अनुवांशिक रूपात याचे सेवन मधुमेहाचे कारण बनू शकतं.

खाज : साखरेची अतिरिक्त मात्रा सेवन केल्याने गुप्तांगामध्ये खाज सुटण्याची तक्रार होते. याने गुप्तांगाहून अत्यधिक तरल स्राव आणि संक्रमण होण्याची शक्यताही असते.

हृदयरोग : अधिक साखरेमुळे हृदयनलिकेत चरबी जमा होऊन ती ब्लॉक होण्याची शक्यता असते. याने हार्ट ॲटॅकची शक्यता वाढते.

इसब : त्वचेवर अधिक साखर सेवन केल्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. एका संशोधनाप्रमाणे साखरेमुळे इसब होण्याची शक्यता वाढते.

कमजोर हाडे : साखरेमुळे हाडे कमजोर होतात आणि ऑस्टिओपोरोसिस रोग होण्याची शक्यता असते.

वजन कमी करायचे आहे? मग काकडीचे सेवन करा!

काकडीत खूप कमी प्रमाणात कॅलरी असतात. १०० ग्रॅम काकडीमध्ये ५४ कॅलरी ऊर्जा असते. म्हणूनच काकडी खाल्ल्यानं वजन वाढत नाही. काकडी ब्लड प्रेशर कमी करते, मात्र ब्लड प्रेशरचा त्रास असणाऱ्या रुग्णांनी काकडीला मीठ लावून खाऊ नये. काकडी शरीरातील विषारी पदार्थ युरिनच्या माध्यमातून शरीराबाहेर काढते.



- सोबतच काकडीच्या ज्यूसमध्ये अशी काही पोषक तत्त्वे आहेत की ज्यामुळं बद्धकोष्ठता आणि ॲसिडिटीची समस्या दूर होऊ शकते.
- पचनक्रिया मजबूत करण्यासोबत काकडी गॅस्ट्रिक आणि छोट्या आतडीचा अल्सर झालेल्या रुग्णांसाठी औषध म्हणून काम करते.
- काकडीमध्ये ९६ टक्के पाणी असतं, जे की कोणत्याही कंपनीच्या बंद बाटलीच्या पाण्यापेक्षा चांगलं आणि शुद्ध असतं.
- काकडीमध्ये अल्कलिन फॉर्मिंग (क्षार) म्हणूनच प्रॉडक्ट्समध्येही प्रयोग केला जातो. यात ॲंटीऑक्सिडंटचं काम करणारे व्हिटॅमिन ए, सी, मॅंगनिज, पोटॅशियम, सिलिका आणि सल्फर असते.
- ताप आल्यास काकडीचा ज्यूस प्यावा. त्यामुळे शरीराचं तापमान नियंत्रणात राहतं.
- जर अपचनाचा त्रास होत असेल तर जेवणासोबत सॅलड म्हणून काकडी खावी.
- काकडी गोल कापून डोळ्यावर ठेवल्यास डोळ्यांची जळजळ कमी होते. दररोज सॅलड म्हणून काळं मीठ, काळीमिरी आणि लिंबू पिळून काकडी खावी. काकडीची कोशिंबिरही बनवून आपण खाऊ शकता.



चामखीळ काढण्यासाठी काही घरगुती उपाय

आपल्या शरीरावर काही वेळा चामखीळ येतात. हे नको असलेले चामखीळ शरीरातील त्वचेची छिद्रे प्रसरण पावत नसल्याने येतात. यावेळी त्वचेस शुद्ध वायू मिळत नसल्याने चामखीळ बनतात. त्याव्यतिरिक्त पापिलोमा विषाणूंमुळे पण चामखीळ होतात. कधी कधी हे तीळ आणि चामखीळ अनुवांशिक असतात तर कधी शरीरातील बदलणाऱ्या हार्मोन्समुळे पण आढळतात. हे तीळ किंवा चामखीळ आपल्या सौंदर्यात बाधक असतात. शरीरावर जास्त प्रमाणात तीळ किंवा चामखीळ असल्यास त्वचा तज्ज्ञांचा त्वरित सल्ला घ्यावा. हे एखाद्या आजाराचे संकेतही असू शकतात. काही वेळा चिकित्सक सर्जरी करण्याचा सल्ला देतात. पण या चामखिळांना आपण काही घरगुती उपाय करून पण नाहीसे करू शकतो. आपण आपल्या स्वयंपाकातील दैनंदिन उपयोगात येणाऱ्या साहित्यांचा वापर करून चामखिळाचा नायनाट करू शकतो. चला तर मग बघू या काय आहे हे साहित्य...

लसूण : लसूण हे फक्त खाण्यासाठी नव्हे तर सौंदर्यवर्धक देखील आहे. लसणाच्या पाकळ्यांची पेस्ट करून दररोज रात्री तीळ किंवा चामखिळावर लावून त्यावर सुती कापड झाकून ठेवावे. सकाळी उठल्यावर अंघोळ करून धुऊन घ्यावे. आठवड्यातून ३-४ वेळा केल्याने चामखिळाचा नायनाट होईल.

कांद्याचा रस : कांद्याचा रस आपल्याला माहीतच आहे की केसांच्या वाढीसाठी तसेच केसांची उत्तम निगा राखण्यासाठी वापरला जातो. याच बरोबर शरीरावरील तीळ किंवा चामखिळासाठी कांद्याच्या रसाचा उपयोग करता येतो. कांद्याच्या रसाला चामखिळांवर तासभर लावून ठेवावे. नंतर स्वच्छ थंड पाण्याने धुवावे. दररोज दिवसांतून हे २-४ वेळा करावे.

कोरफड : त्वचेला सतेज ठेवणे, सुंदर ठेवणे तसेच अनेक आजारांवर कोरफड रामबाण औषध आहे. याव्यतिरिक्त शरीरावरील तीळ आणि चामखिळाचा नायनाट पण कोरफड करते. ताज्या कोरफडीचा जेल तीळ किंवा चामखीळ असलेल्या भागांवर लावावा आणि पट्टीने बांधून ठेवावे. नंतर तासाभराने पुसून किंवा धुऊन घ्यावे. दररोज दिवसांतून किमान ३-४ वेळा हे करावे. तीळ आणि चामखिळीचा नायनाट होतो.

केळे : केळे खाण्यासाठी, केसांची चमक वाढवण्याव्यतिरिक्त त्वचा चमकदार, सतेज बनवण्यासाठी तसेच चामखिळाचा नायनाट करण्यासाठी वापरण्यात येतं. केळे बारीक करून त्याला चामखिळावर लावावे. दररोज असे केल्यास चामखीळ नाहीसे होतात.

एरंडेल तेल : एरंडेल तेल पोटासाठीच औषधी तर आहेच, त्वचेस निरोगी ठेवण्याच्या कामाव्यतिरिक्त तीळ आणि चामखिळावर २ चमचे खायच्या सोड्यात (बेकिंग सोडा) ३-४ थेंब टाकून पेस्ट तयार करून चामखिळावर कापसाने लावावी आणि रात्रभर कापडाने झाकून ठेवावे. सकाळी अंघोळीच्या वेळेस धुऊन घ्यावे. चामखिळाचा नायनाट होतोच आणि डाग पण नाहीसे होतात.



अननसाचा रस : अननसात ॲसिड असते, जे शरीरावरील तीळ, चामखीळ काढण्यास उपयुक्त असते. अननसाचा गर किंवा रस चामखिळावर कापसाच्या सहाय्याने लावावा. काही काळ तसेच ठेवून स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या.

फ्लॉवर (फूलकोबी)चे तुकडे : फ्लॉवरमधील व्हिटॅमिन 'सी' शरीरावरील तीळ आणि चामखिळांचा नायनाट करण्यास उपयुक्त असते. फ्लॉवरचा रस काढून तो चामखिळावर लावावा. अर्ध्या किंवा एका तासाने पाण्याने धुऊन घ्यावे आणि पुसून घ्यावे. चामखीळ आणि तीळ नाहीसे होतील.

स्ट्रॉबेरी : स्ट्रॉबेरी तर सगळ्यांना आवडतेच. मग ते फळ असो किंवा आइसक्रीमच्या रूपात सगळ्यांनाच ती आवडते. यात असलेले पोषक तत्त्व चामखीळ आणि तिळांचा नायनाट करण्यास सक्षम असतात. यासाठी स्ट्रॉबेरीचे बारीक तुकडे करून त्या जागेस लावून चोळावे. नियमित असे केल्यास चामखीळ जाते.

बटाटा : बटाट्याने शरीरातील काळे डाग जातात. तसेच चामखीळ आणि तीळ काढण्यासही उपयोगी असते. यामध्ये ब्लिचिंगचे गुणधर्म आढळतात. बटाट्याचे काप करून चामखीळ असलेल्या ठिकाणी बँडेज करून बांधावे. ७-८ दिवस असे दररोज करावे. चामखीळ आणि तीळ असल्यास आपोआप बँडेजबरोबर निघून जाते.

लिंबाचा रस : लिंबाचा वापर सौंदर्यवर्धनासाठी केला जातो. व्हिटॅमिन सी असल्याने तो त्वचेस फायदेशीर आहे. लिंबाच्या रसाला कापसाने चामखिळावर लावावे आणि टेप लावून ठेवावी. काही मिनिटानंतर हे काढून घ्यावे. दररोज दिवसातून किमान २-३ वेळा असे केल्यास चांगला परिणाम मिळतो.

महाराष्ट्रात लवकरच कोसळणार धो-धो पाऊस...

अखेर मान्सून केरळात दाखल!



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

देशभरातील नागरिकांना प्रतीक्षा असलेला नैऋत्य मान्सून अखेर केरळमध्ये दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाने अधिकृतपणे केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याची घोषणा केली आहे. गेल्या काही दिवसांपासून मान्सूनच्या आगमनाबाबत विविध अंदाज व्यक्त केले जात होते. सुरुवातीला 26 मे रोजी मान्सून केरळमध्ये पोहोचेल, असा अंदाज होता. त्यानंतर 1 किंवा 2 जूनपर्यंत आगमन होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. मात्र, काही दिवसांचा विलंब झाल्यानंतर अखेर 4 जून रोजी मान्सून केरळमध्ये दाखल झाला.

मान्सूनला अनुकूल वातावरण कसे तयार झाले?

हवामान तज्ज्ञांच्या मते, बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे आणि अरबी समुद्रातील सक्रिय मोसमी वाऱ्यांमुळे मान्सूनच्या प्रगतीला मोठी चालना मिळाली. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे ढगांची घनता वाढली असून, त्यामुळे मान्सूनला पुढे सरकण्यासाठी आवश्यक वातावरण तयार झाले आहे. दुसरीकडे अरबी समुद्रातही आर्द्रतेचे प्रमाण वाढले असून, मोसमी वारे सक्रिय झाले आहेत. या वाऱ्यांमुळे केरळमध्ये मान्सूनच्या आगमनाला मदत झाली असून पुढील वाटचालीसाठीही ही परिस्थिती अनुकूल मानली जात आहे.

महाराष्ट्रात प्री-मान्सून पावसाची शक्यता

मान्सून केरळमध्ये दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रातही हवामानात बदल जाणवू लागला आहे. मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्रातील काही भागांमध्ये प्री-मान्सून सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विशेषतः सोलापूर, सांगली, कोल्हापूर आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये तुरळक ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. हा पाऊस मान्सूनचा नसून प्री-मान्सून स्वरूपाचा असेल. वातावरणातील वाढलेली आर्द्रता आणि सक्रिय मोसमी वाऱ्यांमुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

महाराष्ट्रात मान्सून कधी पोहोचणार?

हवामान विभागाच्या पारंपरिक मान्सून आगमन नकाशानुसार 10 जूनच्या सुमारास मान्सून महाराष्ट्राच्या दक्षिण भागात दाखल होण्याची अपेक्षा आहे. तर 15 जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र मान्सूनच्या प्रभावाखाली येऊ शकतो, असा अंदाज यापूर्वी व्यक्त करण्यात आला होता. मात्र यंदा केरळमध्येच मान्सून काही दिवस उशिरा पोहोचल्याने महाराष्ट्रातील आगमनाच्या तारखांमध्ये बदल होणार का, याबाबत पुढील काही दिवसांमध्ये अधिक स्पष्ट चित्र समोर येणार आहे.

देशातील विविध भागांसाठी पावसाचा अंदाज

हवामान विभागाने जारी केलेल्या पर्जन्यमान नकाशांमध्ये दक्षिण भारतातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता दर्शवण्यात आली आहे. ज्या भागांमध्ये निळा रंग दाखवण्यात आला आहे, त्या भागांमध्ये अधिक प्रमाणात पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर मध्य भारतातील काही राज्यांमध्ये, विशेषतः मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या काही भागांमध्ये तुलनेने कमी पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

यलो आणि ऑरेंज अलर्टचा अर्थ काय?

- हवामान विभागाने काही राज्यांसाठी यलो आणि ऑरेंज अलर्ट जारी केले आहेत.
- यलो अलर्ट म्हणजे हवामानातील बदलांसाठी सतर्क राहण्याचा इशारा.
- ऑरेंज अलर्ट म्हणजे अधिक गंभीर परिस्थितीची शक्यता. यामध्ये जोरदार पाऊस, वादळी वारे, मेघगर्जना किंवा विजांचा कडकडाट होऊ शकतो.

म्हणून संबंधित भागांतील नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तज्ज्ञांचा अंदाज काय?

हवामान विभागाचे माजी अधिकारी के. एस. होसाळीकर यांनी 4 जून रोजी दिलेल्या माहितीनुसार, केरळ, कर्नाटक, गोवा किनारपट्टी आणि दक्षिण कोकण भागात पुढील पाच ते सहा दिवसांमध्ये पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मध्यम ते जोरदार पाऊस पडू शकतो. दरम्यान, हवामान विभागाचे अधिकारी एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये मान्सून गोवा आणि कोकणातील काही भागांमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. त्यानंतर तो टप्प्याटप्प्याने महाराष्ट्राच्या इतर भागांकडे सरकेल. अखेर केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याने देशभरातील शेतकरी आणि नागरिकांना दिलासा मिळाला आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र आणि अरबी समुद्रातील सक्रिय मोसमी वा ्यांमुळे मान्सूनच्या पुढील प्रवासाला पोषक वातावरण तयार झाले आहे. पुढील काही दिवसांत गोवा आणि कोकणात मान्सून दाखल होण्याची शक्यता असून महाराष्ट्रातही पावसाच्या आगमनाची प्रतीक्षा आता लवकरच संपण्याची चिन्हे दिसत आहेत.

महापालिकेची पहिली सीबीएसई बोर्डाची शाळा खारेगावमध्ये

८ जूनपासून शाळेला सुरुवात होणार - आयुक्त सौरभ राव

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे महानगरपालिकेची पहिली सीबीएसई बोडार्ची शाळा येत्या ८ जूनपासून खारेगाव येथे सुरू होत आहे. 'क्रिस्टल हाऊस इंडिया'च्या सहकार्याने सुरू होणारी 'ठाणे महानगरपालिका क्रिस्टल हाऊस' ही शाळा विद्यार्थ्यांना दजेर्दार शिक्षण, आधुनिक सुविधा आणि सर्वांगीण विकासाच्या संधी उपलब्ध करून देणार आहे. या शाळेच्या कामकाजाचा आढावा महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी घेतला.



खारेगाव येथील सफायर रुग्णालयाजवळ उभारण्यात आलेल्या या शाळेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम ठाणे महापालिकेकडून सुरू आहे. यामध्ये ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक कक्ष, भाषा प्रयोगशाळा, क्रीडा व कला विभागासाठी स्वतंत्र जागा, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, सीसीटीव्ही यंत्रणा, अग्निशमन व्यवस्था तसेच इमारतीची दुरुस्ती, रंगरंगोटी आणि लिफ्ट बसविण्याची कामे करण्यात येत आहेत.

सध्या शाळेच्या इमारतीची रंगरंगोटी, खिडक्यांना ग्रील बसविणे, खेळाचे मैदान तयार करणे, अग्निशमन यंत्रणेची दुरुस्ती आणि लिफ्ट दुरुस्तीची कामे अंतिम टप्प्यात असून शाळा सुरू करण्याची तयारी पूर्णत्वाकडे पोहोचल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणासह विविध सुविधा

क्रिस्टल हाऊस व्यवस्थापनाकडून प्रशिक्षित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक ते बारावीपर्यंत मोफत शिक्षण, गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, भोजन व्यवस्था आणि वाहतूक सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण, करिअर मार्गदर्शन आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमही राबविण्यात येणार आहेत. प्रारंभी नर्सरी ते दुसरीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यात येणार असून पुढील टप्प्यात इतर वर्गांचा विस्तार केला जाईल.

गुणवत्तापूर्ण शिक्षणाची नवी संधी

या उपक्रमामुळे ठाण्यातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील सीबीएसई अभ्यासक्रमाचे शिक्षण उपलब्ध होणार आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण आणि आधुनिक शिक्षणाची नवी संधी निर्माण होणार असल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. दरम्यान, ठाणे महापालिका आणि क्रिस्टल हाऊस इंडिया यांच्यात ३० सप्टेंबर २०२५ रोजी सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आला असून हा करार ३० वर्षांसाठी लागू राहणार आहे. महापालिकेने प्रशासकीय मान्यता देत सीबीएसई बोडार्ची पूर्व प्राथमिक ते इयत्ता बारावीपर्यंतची शाळा सुरू करण्यास मंजुरी दिली आहे.

सावत्र आई-मुलाच्या अनैतिक संबंधांचा शेवट



■बीड। प्रतिनिधी,

बीड जिल्ह्यातील केज आणि अंबाजोगाई परिसरातून नातेसंबंधांना काळीमा फासणारी एक अत्यंत सुन्न करणारी घटना समोर आली आहे. सावत्र आई आणि 21 वर्षीय मुलाच्या अनैतिक प्रेमसंबंधांचा शेवट अत्यंत दुदैर्वी झाला आहे. समाजात बदनामी होईल, या भीतीने मुलाने अंबाजोगाई येथे विष प्राशन केले. त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. आपल्या प्रियकर असलेल्या सावत्र मुलाचा मृत्यू झाल्याचा धक्का ही महिला सहन करू शकली नाही. अखेर हतबल झालेल्या सावत्र आईनेही गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. हे दोघेही घरातून पळून तेलंगणामध्ये गेले होते, त्यामुळे पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. पोलिसांनी मोबाईल ट्रॅकिंगच्या मदतीने त्यांना शोधून ताब्यात घेतले होते. दरम्यान, दोघेही घरी परतल्यानंतर ही धक्कादायक घटना घडली. पोलिसांनी या दुहेरी आत्महत्येची नोंद केली असून अधिक तपास सुरू आहे. सावत्र आई आणि मुलाने टोकाचे पाऊल उचलल्याने सर्व जिल्ह्यात या घटनेची चर्चा सुरु आहे.

वरिष्ठ लिपिकाची महिला सहकाऱ्याकडे नको ती मागणी, एसटी विभागीय कार्यालयात काय घडलं?

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

एसटी महामंडळाच्या सांगली विभागीय कार्यालयात एक धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. आपल्याच कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्याशी असभ्य वर्तन करून तिच्याकडे थेट शरीरसुखाची मागणी एका वरिष्ठ लिपिकाने केली होती. यामुळे संतापलेल्या पीडित महिलेच्या नातेवाईकांनी लिपिकाला कार्यालयातच चोप दिला. या



घटनेमुळे एसटी विभागीय कार्यालय परिसरात काही काळ प्रचंड खळबळ उडाली होती. भर कार्यालयात घडलेल्या या मारहाणीच्या प्रकारामुळे इतर कर्मचाऱ्यांची एकच धावपळ उडाली, तसेच या घटनेची माहिती मिळताच कार्यालय परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

असभ्य वर्तन आणि शरीरसुखाची मागणी

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वरिष्ठ लिपिक गेल्या काही दिवसांपासून कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्याला सातत्याने मानसिक त्रास देत होता. कार्यालयात काम करत असताना तिच्याशी असभ्य वर्तन करून, त्याने पदाचा गैरवापर करत थेट शरीरसुखाची मागणी केल्याचा गंभीर आरोप त्याच्यावर आहे. वरिष्ठ लिपिकाच्या या सततच्या त्रासाला कंटाळून आणि अत्यंत संतप्त झालेल्या महिला कर्मचाऱ्याने अखेर हा सर्व प्रकार आपल्या कुटुंबीयांना आणि नातेवाईकांना सांगितला.

कार्यालयात घुसून मारहाण

महिला कर्मचाऱ्यासोबत घडलेला हा संतापजनक प्रकार ऐकून तिच्या नातेवाईकांचा राग अनावर झाला. त्यांनी थेट सांगलीतील एसटी विभागीय कार्यालयात धडक दिली. नातेवाईकांनी संबंधित वरिष्ठ लिपिकाला गाठून त्याच्या या कृत्याबाबत जाहीर जाब विचारला. यावेळी वरिष्ठ लिपिकाकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे संतप्त नातेवाईकांचा संयम सुटला आणि त्यांनी सर्वांसमोर त्या लिपिकाला चांगलाच चोप दिला.

कारवाईकडे सर्वांचे लक्ष

या गंभीर प्रकरणानंतर आता संबंधित दोषी लिपिकावर कायदेशीर आणि प्रशासकीय पातळीवर काय कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या घटनेमुळे शासकीय आणि निमशासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा आणि लैंगिक छळाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षित वातावरण मिळणे किती गरजेचे आहे, हे या घटनेवरून पुन्हा सिद्ध झाले असून या नराधमावर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

मॅट्रिमोनी ॲप, शारीरिक शोषण अन् 15 लाख

31 वर्षीय महिला कशी अडकली?

■उल्हासनगर। प्रतिनिधी,

मॅट्रिमोनी ॲपच्या माध्यमातून एका 31 वर्षीय महिलेशी ओळख वाढवून तिची तब्बल 14 लाख 80 हजार रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना नागपुरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी यशोधरा नगर पोलीस ठाण्यात फसवणुकीसह बलात्कार आणि छळाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी मुख्य आरोपी राघवेंद्र किशोर अवस्थी याला अटक केली आहे. मॅट्रिमोनी ॲपवर स्वतःची खोटी माहिती देऊन आरोपीने या महिलेला आपल्या जाळ्यात ओढल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

जिम सुरु करण्याच्या बहाण्याने

आरोपी राघवेंद्र अवस्थी



याने मॅट्रिमोनी ॲपवर स्वतःला घटस्फोटीत असल्याचे सांगितले होते. एवढेच नव्हे तर त्याची पहिली पत्नी जिवंत असतानाही, ती मृत झाल्याची खोटी माहिती देऊन त्याने पीडित महिलेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून आरोपी आणि त्याच्या कुटुंबीयांनी पीडितेकडून वेळोवेळी तब्बल 14 लाख 80 हजार रुपये उकळले. नवीन जिम सुरू करण्याच्या बहाण्याने आरोपीने ही रक्कम महिलेकडून घेतल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

पैशांची मागणी आणि मारहाण

पैसे घेतल्यानंतरही आरोपीची हाव संपली नाही. जिमसाठी त्याने आणखी पैशांची मागणी करत आरोपीने पीडित महिलेला मानसिक व शारीरिकदृष्ट्या छळण्यास सुरुवात केली. या पैशांसाठी तिला वारंवार मारहाण देखील करण्यात आली. लग्न करण्याचे खोटे आश्वासन देऊन आरोपीने तिच्यावर अत्याचार केल्याचा गंभीर आरोपही पीडितेने आपल्या तक्रारीत केला आहे. या सततच्या त्रासाला कंटाळून अखेर महिलेने पोलिसांत धाव घेतली.

आरोपीला ठोकल्या बेड्या

पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीच्या आधारे यशोधरा नगर पोलिसांनी तात्काळ कारवाई करत विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आणि मुख्य आरोपी राघवेंद्र अवस्थी याला बेड्या ठोकल्या.

14 वर्षीय मुलीवर 20 दिवस कुलूपबंद घरात नको तेच... लाज आणणारा प्रकार

■मुंबई। प्रतिनिधी,

शाळेत जाणाऱ्या एका 14 वर्षीय अल्पवयीन मुलीवर तब्बल 20 दिवस सामहिक अत्याचार करण्यात आल्याचा धक्कादायक प्राकर उघडकीस आला. संबंधित प्रकरणात तिच्या कुटुंबीयांनी आरोप केला की, तीन तरुणांनी तिचे अपहरण करत नंतर पीडितेला ओलीस ठेवलेत. पोलिसांपासून बचाव व्हावा यासाठी ते सतत जागा बदलत होते. सुरक्षित जागेच्या शोधात असताना, एका तरुणाच्या कुलूपबंद घरात तिला ठेवण्यात आले होते, मात्र तपासादरम्यान ती सापडलीच. ही घटना उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील आहे.

नेमकं काय घडलं?

सोमवारी, पोलिसांच्या मदतीने मृतदेह ताब्यात घेतला आणि दोन आरोपींच्या मुसक्या आवळल्या. कुटुंबीयांचा असा आरोप की, पोलीस हे प्रकरण मिटवण्यासाठी सातत्याने त्यांच्यावर दबाव आणण्याचे काम करत आहेत. विद्यार्थिनीच्या आईने सांगितलं की, पोलिसांनी मिळून विद्यार्थिनीला धमकावले होते, नंतर तिच्याकडून स्वतःच्या विरोधात व्हिडिओ बनवला आणि नंतर पोलिसांच्या गाडीत टाकून नेले.

महिलेनं सांगितलं की, नवऱ्याचे आधीच निधन झाले होते, नंतर मुलगी बेपत्ता झाली होती. तिने तिच्या सर्व नातेवाईकांकडे शोध घेतला, मात्र त्या मुलीचा कुठेही शोध लागला नाही. तिला काही लोकांवर अधिक संशय होता आणि तिने पोलिसांना त्यांची नावे दिली होती, पण पोलिसांनी त्याकडे फार लक्ष दिले नाही.

या प्रकरणात आईचा असा आरोप की, पोलीस संबंधित प्रकरण मिटवण्यासाठी त्यांच्यावर सातत्याने दबाव आणत होते. पोलिसांनी वैद्यकीय तपासणी केली असून संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू आहे.

मुलगी सायंकाळपर्यंत घरी परतलीच नाही

चौबेपूर पोलीस ठाणे परिसरातील गावात अल्पवयीन मुलगी ही 11 मे रोजी संशयास्पदपणे बेपत्ता झाली. शाळेत गेलेली मुलगी सायंकाळपर्यंत घरी न परतल्याने, तिच्या आईने तिचा शोध सुरू केला, कुटुंबीय व इतर नातेवाईकांना याबाबतची माहिती मिळाली होती. पीडित विद्यार्थिनी बरेच दिवस होऊन गेले तरीही परतली नाही, तेव्हा या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती.

15 वर्षीय मुलीवर अत्याचार

पेट्रोल ओतून मृतदेह जाळला...भयंकर घडलं

■मुंबई। प्रतिनिधी,

ग्वाल्हेरहून एका किशोरवयीन मुलीसोबत क्रर कृत्य घडलं. पोलिसांनी संशयातून एका 15 वर्षीय मुलीचा जळालेला मृतदेह ताब्यात घेतला. हा मृतदेह भिंडच्या बाऊ भागातून बेपत्ता झाला असावा, असा संशय व्यक्त करण्यात आला. मुलीची हत्या करण्यापूर्वी तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार करण्यात आला होता. वास्तविक, भिंड जिल्ह्यातील माऊ भागातून 15 वर्षीय मुलगी 28 मे रोजी बेपत्ता झाली. मुलीच्या कुटुंबीयांनी तिच्या बेपत्ता झाल्याची माहिती माऊ पोलिसांना दिली होती. तेव्हापासून पोलीस मुलीचा शोध घेत होते.

अल्पवयीन मुलीचा छिन्नविछिन्न जळलेला मृतदेह

ग्वाल्हेरचे सीएलपी मनीष यादव यांनी सांगितलं की, सोमवारी सायंकाळी ग्वाल्हेरच्या गोल पहारिया भागातील गुप्तेश्वर टेकडीवर एका अल्पवयीन मुलीचा छिन्नविछिन्न जळलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला होता. मुलीची ओळख पटवण्यासाठी भिंडच्या मऊ पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

दरम्यान, मऊ पोलिसांनी सांगितलं की, त्यांच्याच भागातील अल्पवयीन मुलगी अलीकडेच बेपत्ता झाली होती. संशयितांच्या मोबाईलचे लोकेशन तपासण्यात आले असता, ते घटनास्थळाजवळ असल्याचे आढळून आले. त्यामुळे ग्वाल्हेर पोलिसांनी ताब्यात घेतलेला मृतदेह त्याच अल्पवयीन मुलीचा असल्याचा अधिक संशय व्यक्त केला.

या प्रकरणात भिंड पोलिसांनी तपासादरम्यान मृतदेह सापडला. तांत्रिक पुराव्याच्या आधारे, भिंड पोलिसांनी संशयित प्रियकर असलेल्या रामू गुर्जरला ग्वाल्हेरहून ताब्यात घेत चौकशी केली. त्याने मित्रांसोबत अल्पवयीन मुलीच्या संपर्कात असल्याची कबुली दिली. पेलिसांनी गोल पहारिया परिसरात मृतदेहाचा शोध घेतला असता, अल्पवयीन मुलीचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला. दरम्यान पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला.

दरम्यान, पोलिसांनी आरोपी रामू आणि त्याच्या दोन साथीदारांची कसून चौकशी केली. तसेच घरातून मुलगी पळून गेल्याची आणि तिच्यासोबत काही दागिने गेल्याची घेऊन गेल्याची कबुली दिली. मात्र, या प्रकरणात सामूहिक लैंगिक अत्याचाराचा पोलिसांनी संशय व्यक्त केला.

15 वर्षीय मुलीवर बापाचा बलात्कार, तीन वर्ष सगळं सहन केलं, शेवटी...

'असं' बाहेर आलं प्रकरण

या प्रकरणातील धक्कादायक बाब म्हणजे पीडित मुलगी मानसिकदृष्ट्या अस्थिर आहे. काही महिन्यांपूर्वी तिने मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर तिला उपचारासाठी दुर्गापूर येथील मिशन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते, परंतु तिच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा झाली नाही. अखेर एप्रिल महिन्यात तिची आई आणि वडील तिला पुढील उपचारासाठी वेल्लोर येथे घेऊन गेले. वेल्लोरमधील डॉक्टरांनी तपासणी दरम्यान मुलीची अवस्था पाहून संशय व्यक्त केला आणि तिला विश्वासात घेऊन प्रेमाने विचारपूस केली. तेव्हा त्या मुलीने आपल्यावर बेतलेला हा भयानक प्रसंग डॉक्टरांना सांगितला, ज्यामुळे या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला.

■मुंबई। प्रतिनिधी,

वडील आणि मुलीच्या नात्याला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. स्वतःच्या 15 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर एक 47 वर्षीय बाप गेल्या तीन वर्षांपासून लैंगिक अत्याचार करत होता. या नराधम बापाला अखेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. पश्चिम बंगालमधील दुर्गापूर परिसरातील ही घटना आहे. काल (1 जून) सकाळी आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. आरोपी हा एका नामांकित कंपनीत मॅनेजर पदावर कार्यरत असून, अवघ्या चार महिन्यांपूर्वीच तो येथे रुजू झाला होता. त्याच्या विरोधात त्याच्याच पत्नीने 31 मे रोजी दुर्गापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. अटक केल्यानंतर पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केले आणि पुढील कारवाईसाठी त्याला आपल्या ताब्यात घेऊन रवाना झाले.

तीन वर्षांपासून लैंगिक शोषण

पीडित मुलीने डॉक्टरांना सांगितले की, तिचा बाप गेल्या तीन वर्षांपासून तिचे लैंगिक शोषण करत होता. जेव्हा कधी तिने या अत्याचाराविरोधात आवाज उठवण्याचा किंवा विरोध करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा 'तुज्या आईला सोडून निघून जाईन', अशी धमकी बापाने तिला दिली होती. वडिलांनी आपल्यामुळे आईला सोडू नये आणि आईचा संसार सुखाचा राहावा, याच भीतीने ती निष्पाप मुलगी गेली तीन वर्षे हा सगळा नरक यातनांचा छळ मुकाट्याने सहन करत होती. मुलीचा हा जबाब ऐकून हादरलेल्या आईने वेळ न गमावता तात्काळ वेल्लोरमधूनच 'झिरो एफआयआर' दाखल केला आणि त्यानंतर 31 मे रोजी दुर्गापूर पोलीस ठाण्यात पतीविरुद्ध रीतसर गुन्हा नोंदवला.

बापाचा वेगळाच आरोप

सोमवारी (1 जून) दुर्गापूर पोलिसांनी दुमका नगर पोलिसांच्या मदतीने सापळा रचून आरोपीला अटक केली. दरम्यान, पोलिसांच्या ताब्यात असलेल्या आरोपीने स्वतःवरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. आपले पत्नीसोबतचे संबंध चांगले नसल्याचा दावा त्याने केला असून, आपण काहीही चुकीचे केले नसल्याचे म्हटले आहे. पत्नीनेच मुलीचा आधार घेऊन एका रचलेल्या कटाचा भाग म्हणून आपल्याला खोट्या गुन्ह्यात अडकवल्याचा अजब दावा आरोपी बापाने केला आहे. मात्र, पोलिसांनी या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीविरुद्ध कडक कलमांखाली गुन्हा दाखल केला असून पुढील तपास वेगाने सुरू केला आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com